म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2039
21-12-63
REFBK-0013499



# प्रसन्न-माधवी

— मा. त्र्यं. मंगरूळीक

२०३१

८४५८३
११।३।८१.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

REFBK-0013499
REFBK-0013499

# प्रसन्न माधवी

कवि.
मा. व्यं. मंगसुळीकर

प्रास्ताविक
ग. दि. माडगूळकर

मूल्य अडीच रुपये

प्रकाशक
पंडित अनंत कुलकर्णी
१८६ शनवार, पुणें २

© मा. व्यं. मंगसुळीकर

प्रथमावृत्ति १९६३

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
४०५ नारायण पेठ
पुणें २

# प्रसन्न माधवीच्या छायेंत

**रसिका,**

आज प्रसन्न माधवीच्या काव्य कुसुमांची ओंजळ तुझ्या पुढें आणतांना ( कां कोणास ठाऊक )—संकोच आणि तज्जन्य भय यांनीं मन भांबावून गेलें आहे. या पूर्वी वेणुरव, गीतवाहिनी, माझी मातृभूमी, माझा नारायण, देहाचें दान, शुभांगी अशा लहान सहान गद्य पद्य गुच्छांनीं महाराष्ट्र शारदेची यथामति पूजा केली. पैकीं 'भिकारीण व इतर कवितां'च्या संग्रह सुवासानें तुझें मन इतकें बहरलें कीं तीं फुलें तीन वेळां मागून घेतलीस. माझें शरीर तुझ्या कौतुकानें पुलकित झालें.

मध्यंतरीच्या दोन अडीच तपांच्या कालांत प्रतिकूल परिस्थितीच्या झंझावातांत माझी ही वेल उखडून जाते कीं काय अशी भीति वाटूं लागली. जीवन संघर्षातील भीषण तापानें माझ्या या वेलीला मिळणाऱ्या जिवंत झऱ्याचें पाणीही आटून जाऊन तिचें अस्तित्वही नाहींसें होईल कीं काय अशी शंका मनाला भेडसावूं लागली. पण अशाही परिस्थितींत माझ्या या वेलीवर कुणा एका मेघाला कणव येऊन डंवरलेल्या एका भावफुलाला पाहून त्यांनीं चिंतनाचा गारवा आणला. ज्या मानवतेच्या पूजकानें आपले सढळ हात आणि अढळ मन पुढें करून एका अनामिकानें माझ्या या वेलीला पुरेपूर पाणी घातलें. जीवन दिलें. प्रतिभेला आवाहन देऊन जागृत केलें त्या थोर अनामिकाचे आभार कोणत्या शब्दांनीं मानूं ?

हा कांहीं तारुण्याच्या उन्मादानें सुगंधित झालेला बहर नव्हे. प्रदीर्घ कालानंतरचीं उतार वयांतलीं उमलेलीं हीं फुलें आहेत आणि म्हणून सत्प्रवृत्ती अन् सुसंस्कृती या दोन देवतांचीं मनोभावें पूजा करून, ईशसेवेची फलश्रुति लोकसेवेंत आहे हें जाणून लोकसेवेला तन, मन, धन, सर्वस्व समर्पण करणारे महाराष्ट्रांतील थोर राजर्षि श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर फलटण यांना ही माझी 'प्रसन्न माधवी' प्रेमादरपूर्वक त्यांच्या तेजस्वी त्यागाला सादर समर्पण करीत आहे.

साखरवाडीसारख्या एका कोपऱ्यांत उगवलेल्या या वेलीला सूर्यप्रकाशांत आणण्याचें श्रेय महाराष्ट्राचे थोर प्रतिभावंत कवि श्री. ग. दि. ऊर्फ आण्णासाहेब माडगूळकर यांना आहे. या थोर कलावंताच्या प्रेमळ आणि भरीव पाठिंब्यामुळेंच ही कलाकृती प्रकाशित होत आहे.

माझ्या वेलीला अनेकांचे हातभार लागलेले आहेत हें मी माझें भाग्य समजतों. सर्वांचा नामनिर्देश करणें मला कठीण आहे. तथापि सातारचे ध्रुवाचे संपादक त्र्यं. रा. अभंग ज्यांनीं माझ्या भंगलेल्या प्रतिभेला जोड देऊन अभंगत्व आणण्याचें कार्य केलें त्यांचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. तसेंच फलटणचे वा. मो. कोळेकर, उगार खुर्दचे श्री. अ. रामतीर्थकर व माझे जुने कवि मित्र पुण्याचे म. भि. कुलकर्णी, सोलापूरचे अंदूरकर आणि नागपूरचे कल्याणराव आंबेवाडी व साखरवाडींत ज्याच्याशीं काव्य चर्चा करण्यांत सहकार्य दिलें ते साखरवाडीचे कवि मित्र श्री. ग. गं. एरंडे व व. पां. हेबाळकर यांना किती धन्यवाद द्यावे तितके थोडेच आहेत.

माझ्या साऱ्या आकांक्षा तृप्त करण्याचें खरें कार्य महाराष्ट्र राज्य सरकारचें आहे. त्यांचे आभार मी तर मानेनच. माझी सारी कुटुंबीय मंडळी त्यांच्या कृतज्ञतेच्या सावलींत आहेत. त्यांनीं माझ्या उतार वयांत स्वास्थ्य आणि समाधानी लाभावी म्हणून वेळींवेळीं मानधन देऊन मला ऋणाइत करून ठेवलें त्यांचे आभार माझ्या हृदयांतील मुके बोलच मानतील. माझे दोन सुपुत्र चि. प्रभाकर व राजा हे माझ्या स्वास्थ्यासाठीं श्रम आणि यातनेंचें ओझें वाहतच आहेत.

शेवटीं पुण्याचे पंडितराव कुलकर्णी यांनीं प्रसन्न-माधवीला सुंदर सुबक करून रसिकापुढें आणल्याबद्दल त्यांना धन्यवाद आणि प्रकाशनाच्या वाटेवर कुठलेंही बुजगावणें न दाखवितां सरळ मार्ग दाखविल्याबद्दल पुन्हा एकदां धन्यवाद देत आहे.

**जनता जनार्दन**

आता दीपावलीच्या मंगल प्रसंगीं "निर्माल्यांतील कळ्या" घेऊन (कथासंग्रह) तुझ्या सेवेला येत आहे.

शुभं भवतु

रसिकांचा नम्र कृपासेवक

***मा. त्र्यं. मंगसुळीकर***

# दिसण्या आधीं येतो परिमल--

श्री. मा. व्यं. मंगसुळीकर यांचा ' प्रसन्न-माधवी ' वरवर चाळला तरी एक गोष्ट सहज लक्षांत येते कीं, ही एका ' गृहस्थ ' कवीच्या सुखदुःखाची काव्यमय अभिव्यक्ति आहे. गृहस्थाच्या मनाचा प्रामाणिकपणा, त्याची सामाजिक अनुभूति, त्याच्या अविचल श्रद्धा या सर्वांचें प्रतिबिंब या काव्य-संग्रहांत आपल्याला दिसतें.

पोट भरण्यासाठीं आणि संसाराचा गाडा ओढण्यासाठीं कवीला वेगळा व्यवसाय करावा लागला तरी त्याचें कवितेवरील प्रेम यत्किंचितही कमी झालें नाहीं. उलट,

" मोठी आवड काव्यलेखन खरी, ना द्रव्य हातीं मुळीं
लोकां दाखवूं कशा करोनि कविता, माझी मति भागली "
(' मित्रास ')

अशी खंती, त्यानें व्यक्त केली आहे.

संसारांत आलेले बरेवाईट प्रसंग कवीनें आपल्या संवेदनाक्षम मनानें टिपून घेतले आहेत. घरांत बागडणाऱ्या मुलाचें ' बाळा, तूं ध्रुवा रे ' म्हणून त्यांनीं कौतुक केलें आहे. प्रपंचांत आपलीं पांच मुलें म्हणजे आपलें पंचप्राण आहेत असें त्यांनीं म्हटलें आहे. या मुलांमुळें होत असलेल्या आनंदापुढें ' स्वर्गही ठेंगणा ' आहे, अशी ग्वाही दिली आहे. सासरीं जाणाऱ्या मुलीला यथोचित उपदेशही केलेला या संग्रहांत आढळतो. हे सर्व अनुभव कोणाही मध्यम-वर्गीयास येणारे असे वाटतात. यांत जीवनप्रवाहाच्या तळाशीं जाण्याची शक्ति दिसत नसली, तरी ' अंतरींचे धांवे, स्वभावें बाहेरी ' अशी प्रामाणिक अनुभूति मात्र जरूर जाणवते.

कधीं कधीं मात्र या सांकेतिक अनुभूतीच्या कक्षा ओलांडून कवि जाऊं पाहतो. अर्थात् यांतही गृहस्थाचें वैशिष्ट्य असा संयम दिसून येतो. वार्धक्याचें वर्णन करतांना कवि म्हणतो,

“ राकट जुनाट संसार बागेंत
खोड हे नांदत, उगा येथें
झालें गेलें त्याचें जीवन संपलें
उगि कां ठेविलें, देव जाणे
('कां ठेविलें ?')

किंवा,—

पोरेंबाळें वचनें टोचती
मालकीणही बोल बोलती
वार्धक्याची दुबळी वृत्ति
नव्हे सोबतीण, जखीण जरा...
('जा उडून पांखरा दिगंतरा')

याच संदर्भांत कवीचा आणखी एक विशेष सांगून टाकला पाहिजे आणि तो म्हणजे कल्पनेचे रंग भरून अभिव्यक्तीला भडक करण्याचा प्रयत्न त्यानें कुठेंच केला नाहीं. यामुळें या संग्रहांतील कवितांना एक प्रकारची निरागस सुबोधता आली आहे.

रूढ कल्पनांना झुगारण्याचा बंडखोरपणाही कधीं कधीं कवीच्या मनांत दाटून येतो. व त्यांतूनच,

उठ गा मना तूं कर अविचार
पुरे हा लाचार, विचारांचा
विचारें साधले, कुणी काय सांग
मना तूं अपंग होशी मात्र.
('अविचार')

अशा ओळी जन्म पावतात.

भोंवतालच्या सामाजिक परिस्थितीकडेही कवीनें डोळसपणें पाहिलें आहे. त्याची प्रतिक्रियाही या कवितांतून दिसून येते. आकाशांतील ग्रहणाकडे आपलें लक्ष जातें, पण आपल्या भोंवतालची सामाजिक 'ग्रहणें' आपल्याला दिसत नाहींत याबद्दल कवीला सखेद आश्चर्य वाटतें. 'खेड्याकडे चला' म्हणूनही तो सर्वांना हांकारतो.

"अन्नदाता तो उपाशी ना कुणा त्याची क्षिती
दैन्य त्याच्या भोंवतीं"

उलट्या जगरीतीचें औपचारिक वर्णन कवीनें केलें आहे.

श्रद्धा हा या कवीचा खरें तर स्थायीभाव आहे. पण त्यांतही अनामिकाच्या अभंगासारखा वरकरणी उद्धटपणानें देवाला शिव्या घालण्याचा प्रयत्न दिसून येतो. उदा–

"निर्धनाला भेटे कसा नारायण
त्याचें देवपण, वाढे कैसें
धनवंता घरीं, दासाहूनी दास
राही परमेश, सदाकाल".

(निर्धनाला भेटे कसा नारायण)

किंवा,—

"पापाचिया पापा, देवा मायबापा,
नका देउं थापा, तुम्ही मज"

अशी परमेश्वराला शिव्या घालण्याची, जनी नामयासारखी आगळी धिटाईही यांत आढळते. एरवीं कवीनें सांकेतिक पद्धतीनें देवाची आळवणी केली आहे, पांडुरंगाचा पाळणा गायला आहे. व्यंकटेशाची भूपाळी आळवली आहे, ज्ञानदेवाच्या समाधीचा प्रसंग भक्तिभावानें वर्णन केला आहे.

प्रीतिकाव्य या संग्रहांत अगदीं थोडेंच आहे. त्यांतही 'मोहिता' यासारखें एखादें ग्रामीण गीतही येऊन जाते. किंवा 'वायदा' सारखें लाघवी प्रणय-क्रीडेचें वर्णनही येतें. 'दग्ध आशा' सारखें विरहगीतही डोकावतें. पण यांत कवि रमत नाहीं; असें वाटतें.

स्वदेशाविषयींमात्र कवीला जाज्वल्य निष्ठा आहे. या संग्रहाच्या आरंभीं आढळणारीं समरगीतें हीं या निष्ठेचींच निदर्शक आहेत. याखेरीज, बऱ्याच प्रासंगिक कविता या संग्रहांत आढळतात. प्रासंगिक कवितांना काव्यगुणाचे निकष लावण्यापेक्षां, त्यामागील भावनेच्या खोलीचा अंदाज घेणें, व तिचा प्रामाणिकपणा जाणून घेणें, हेच खरे निकष ठरतील. आणि या निकषाला या सर्व कविता उतरतील यांत मला बिलकूल संदेह नाहीं.

या कवीच्या आणखी एका गुणाचा येथें आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या कवीला रचनेची सफाई अगदीं सहज साधली आहे. शब्दकलेचा अभाव थोडासा जाणवला तरी वृत्तवैचित्र्यामुळें कवीच्या व्यासंगाविषयीं कौतुक वाटतें, नवल वाटतें.

अस्तु. श्री. मंगसुळीकरांचें वय आज साठाच्या वर असावें. आयुष्यभर कवितेशीं इमान राखून त्यांनीं जी कांहीं रचना केली आहे, ती वाखाणण्यासारखीच आहे. त्यांनींच एके ठिकाणीं नम्रपणानें म्हटल्याप्रमाणें,

' ओजस्विता काव्यशक्ति नसे.
परी भक्तिनें अक्षरें कोरिलीं '

अशी त्यांची भक्तिभावपूर्ण कविता महाराष्ट्र–रसिक गोड मानून घेतील, अशी मला खात्री आहे.

पंचवटी,
११, मुंबई रस्ता
पुणें ३.

ग. दि. माडगूळकर

# कवितानुक्रम


१ प्रसन्न माधवी
२ त्वत्पादपद्मीं
३ हिमालयाची हांक
४ हिमालयावर शंख फुंकिले
५ जागा हिंदुस्थान
६ नवमहाराष्ट्र निर्मात्यास
७ उजळला शिवनेरी किल्ला !
८ धन्य तूं ग इंद्रायणी
९ साहित्याची गंगा आली कृष्णेच्या भेटी
१० आजन्म भिकारी तुझ्यापुढें
११ कसा तुज म्हणू मी परमेश्वर
१२ अविचार ( अभंग )
१३ नकोस येऊं माझ्याजवळीं
१४ जा उडून पांखरा दिगंतरा
१५ दिव्य-फुलास
१६ त्यांचें मोल
१७ कां ठेविलें !
१८ कधिं येशी ! कधिं नेशी !
१९ निर्धनाला भेटे कसा नारायण
२० व्रतस्थ मुंजामुलास
२१ या चला खेड्याकडे
२२ कोयनेस
२३ गोविंदाग्रजास
२४ माझी मातृभूमी
२५ उदासवाणें गाणाऱ्यास
२६ अरुणोदय
२७ धर्म
२८ ग्रहण
२९ स्वैर--संचार.
३० दग्ध-आशा
३१ मित्रास

३२ चुकलेला वायदा
३३ प्रभो ये तातडी
३४ अभागिनीचे अश्रु
३५ वेंदूर
३६ चिंतेनें रे भरलें जीवन
३७ पूजा
३८ याल कां हो देवा
३९ विधिची कारागिरी
४० सारेच भिकारी
४१ मोहिता
४२ निरोप
४३ उदयाचलिं येत अरुण
४४ दिपवित ही आली
४५ प्रीतिच्या या आसवांनीं
४६ जय-पाहि मां करुणाकरा
४७ पांडुरंगाचा पाळणा
४८ मोहिनी
४९ नको मागाहून भांडणें तें
५० जाऊं कोणापाशीं सांग आतां
५१ चाललि घरट्यांतुनी
५२ बाळ तूं ध्रुवा रे
५३ प्राक्तनाचा प्रातःकाल
५४ स्वर्गही ठेंगणें इथें
५५ माझें गांव
५६ सांत्वन
५७ अभागी जीवन
५८ वसुधरेची ओवाळणी
५९ हळूच बघते
६० राधा माधव
६१ श्रीज्ञानेश्वरमाऊलीचें महाप्रस्थान
६२ शेवटीं मी

## श्रीमंत मालोजीराजे नाईकनिंबाळकर, फलटण



### सादर समर्पण

राजा ! सोवळे पद्यांचे श्रुतिपुटीं –
विद्वान् कृती साजरी ५
बाळाचे परि बोबडे परिसुनी –
संतोष हो अंतरीं ५
देवा त्यापरि घेई सदैव यदपि –
पीयूष पानें तरी ५
भिल्लीचीं बदरें तयास रुचलीं –
हें ही गमो त्यापरी ॥१॥

मा. व्यं. मंगसुळीकर



मा. व्यं. मंगरुळीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १३०९९


# प्रसन्न माधवी

हे सुमन माधवी हसते डुलते पाही !
जगिं सुखदुःखाची जाणिव याला नाहीं !
या ध्येय एक कीं गंध परांना देणें
नच स्वार्थासाठीं या जगीं याचें येणें
पदिं चुरगळलें तरि खेद न वाटे कसला
मातींत मिळे तरि जाणिव मुळिं नच याला
वाटिके मधिल तूं शोभसि वैभव राणा
या इतर लता बघ ! करिती तव सन्माना
हा पवन वाहतो नेई गंध हरोनी
रसिकांस तोषवी धन्य असासि तूं भुवनीं
तूं हास असाची खंड न पाडी सुमना !
डोलवीत कवि तुज पाहुनि मोदे माना

## त्वत्पादपद्मीं --

सोडी अबोला म्हणी बोल कांहीं
वृथा रोष कां हा, जगन्मोहिनी !
मानूं कुठें मी समाधान माते–
अशी दूर कां राहसी सोडुनी.
त्वन्मूर्ति या मानसी साठविली
न थारा दुजाचा तुझ्यावीण गे
संसारनौका प्रवासीहि नवखा
तरोनी कसा सिन्धु जाईल गे !
धिक्कारितां तूं अभागी जिवा या
जगामाजिं थारा न कोठें मिळे
वाटे कृपेवीण तुझ्या जगीं या
वृथा जन्म हा सौख्य तें कोठलें
देवोनिया हात या दीन आर्तासि
शांती सुधा पाजवी एकदां
त्वत्पादपद्मीं रमो चित्त माझें
न इच्छी कदा लौकिकी संपदा

# हिमालयाची हांक

हिमालया ! तव हांक ऐकुनी काळिज चरचर करी
कळेना असें कसें हें परी
भारत सारा गडबडला बघ भानच कीं हरपलें
चित्त हें तुझ्यावरीं खिळियलें
भाई, भाई, म्हणुनि घातली उरीं घातकी सुरी
नीच तो असे अरी बहुपरी
तुझ्या तरुतळीं रक्त सांडलें पवित्र भूमीवरीं
भावना चेकाळत अंतरीं
धगधगत्या या प्राणज्योती भारत वीरां तरी
जाळण्या दुष्ट असा हा अरी
मारूं किंवा मरू मंत्र हा रण वीरांच्या उरीं
एकच शूरांच्या अंतरीं
कळवळुनी ये करुणाधन तो धावत हाके परी
चेतवी रणनीती श्रीहरी
आर्यांच्या तूं पवित्र तेजा पूर्वेच्या भास्करा
असशि तूं पुण्यवान रे खरा
गंगा, यमुना, फल्गु आणिक कितीक तीर्थोदकें
उगवलीं तुझ्याच चरणोदकें
आद्य ऋषींचें स्थान सुमंगल तव पुण्याईमुळें
खचित कीं स्वर्गतुल्य जाहलें
त्यांचि तपस्या संकट कालीं येईल संरक्षणा
करुं नको कुणास आमंत्रणा

# हिमालयावर शंख फुंकिलें

हिमालयावर शंख फुंकिले डमरु शिवाचे डुमडुमले
खडबडुनी हा जागा झाला भारत सारा एक दिलें
हिमालयावर घाव घातला दुष्ट चिन्यानें फसवुनिया
सूड घ्यावया वीर निघाले क्रोधानल हे होवुनिया
उठा कवींनो, शाहीरांनो, गा शौर्याचे पोवाडे
जयगीताच्या शब्दरवानें सैन्य जाउं दे असे पुढें
मृत्युंजय जयवंत मराठे वीर धुरंधुर ठरलेले
तसेच रजपुत शीख नि गुरखे पंजाबी ते वीर भले
रण मरणाची भिति न त्यांना बाहु रणास्तव फुरफुरले
रक्त तयांचे उसळुनि आले सूड एक मनिं ठसलेले
देशासाठीं मरणें जगणें मरणाचें भय कोणाला
मरणालाही मारुन उरलें देशास्तव ते भूमितलां
अन्यायाशीं लढत आमुची दगलबाज या चीन्याशीं
पराक्रमानें दिग्विजयानें दिपवू साऱ्या जगतासी
चंद्र सूर्य हे असति जोवरी पूज्य हिमाचल हा आमुचा
नजर कुणाची जाइल त्यावर होतिल डोळ्यांच्या खाचा
प्राणपणानें सदैव रक्षूं प्राणाचें बलिदान करूं
आजिंक्य आमुचा हिमगिरि राजा अजिंक्य तो मस्तकीं धरूं
पुन्हा न येतिल पुनरपि बघतिल सरहद्दीच्या सीमांना
भारतभूच्या सामर्थ्याचा अनुभव येइल सर्वांना
हिंद भूमिचा उंच यशोध्वज हिमगिरि वरती डौलानें
फड फडुनी तो सांगे जगतां न्याय नीतिती शुद्ध मनें
उद्या उगवत्या इतिहासाचीं दिव्य अक्षरें सोनेरी
काळाचा कर लिहील सारें सत्यासत्य तें हिमशिखरीं

# जागा हिंदुस्थान

जागा हिंदुस्थान, चिन्यांनो, जागा हिंदुस्थान
रक्त सांडुनी रक्षण करतिल भारत-भू-संतान
कितीं संकटें येउनि गेलीं आर्यावर्ती जाण
कुणी रक्षिलें सांगा तेव्हां अर्पुन पंचप्राण
प्रसंग नव्हता तसला आला तूंच चिनी नादान
उठा मर्द हो घाला याला घाला कंठ स्नान
धाक घालसी नीच नराधम कुणास तूं हें जाण
अबला याही तुला तुडवितिल झालेल्या बेभान
संकट कंटक पदतलिं तुडवुन करतिल जयजयकार
हिमगिरी आमुचा रक्षूं आम्ही एकच हा निर्धार
चाळिस कोटी आम्हीं लेकरें करुं तुज रे हैराण
आम्हीच आमुचे भाग्यविधाते करुं तुज निसंतान
कृतांत आतां जरी आडवा आला ना हरणार
भारतभूचा हिमगिरि आमुचा पूज्यच हा रहाणार
जागा हिंदुस्थान, चिन्यांनो, जागा हिंदुस्थान
रक्त सांडुनि रक्षण करतिल भारत भू संतान

## नवमहाराष्ट्र निर्मात्यास

शिवरायाला आधीं नमुनी जयजयकार करा
        बंधुनो, जयजयकार करा
महाराष्ट्राचा नेता आला
        आज आपुल्या घरा        १
यशवंताचा गौरव करुनी
        अर्पूं सुमनांजली
                आदरें, अर्पूं सुमनांजली
सद्भावानें स्वागत करुं या
        या मंगल कालीं        २
धन्य प्रतापी यशवंता तूं
        महाराष्ट्र वीर
                खरा तूं महाराष्ट्र वीर
देशासाठीं तुवां दाविला
        अखंड निर्धार        ३
स्वातंत्र्याच्या वीरश्रीची
        प्रभाविणी वाणी
                तुझी ती, प्रभाविणी वाणी
पडतां कानीं, रणीं उसळलें
        कृष्णेचें पाणी        ४

निजलेल्या अभिमानी स्वकरें
हालवुनी जागें
केलें हालवूनीं जागें
मर्द मराठा मनें धावली
तुज वीरा संगें ५
तुज त्यागमय स्फुर्तिलतेवर
फुलला महाराष्ट्र
नव्यानें, फुलला महाराष्ट्र
परिमल सेवुनि देशभृंग हा
झाला संतुष्ट ६
तुझ्या यशाला कर्तृत्वाला
घेई नजराणा
कवीचा, घेई नजराणा
तूंच सारथी महाराष्ट्राचा
शिवबाचा तान्हा ७
किती स्तवावें ? किती गुण गावे ?
वाचेनें नरवरा
मूर्त या वाचेनें नरवरा !
स्वजनवृन्द हा देई सुमनें
मानाचा मुजरा ८

## उजळला शिवनेरी किल्ला !

वैभवशाली यशोदुंदुभी नवमहाराष्ट्राचा
गर्जतो प्रतिष्ठापनेचा
नव्या युगाच्या नव्या उमेदी उत्फुल्लित झाल्या
भावना झेपावत आल्या
आकांक्षेचीं सुखस्वप्नें तीं फलद्रूप झालीं
आज त्या प्रसन्नता आली
शौर्य धैर्य ऐश्वर्य आमुचें दावूं जगताला
मराठा बाणा हा असला
शिवप्रभुचे पराक्रमाचे पोवाडे गातां
डोलते अजूनहि जनता
वंशज आम्ही शिवरायाचे ज्या नरवीराचें
पाठबळ आम्हांस नीतीचें
मानवता ही अविरत नांदे शिकवण संताचीं
आम्हांला श्रीज्ञानेशाची
एकनाथ वा संत तुकोबा शिकवित अद्वैत
पढविती समतेचें सूक्त
राजनीतिचे धडे शिकविले राजगुरु थोर
आम्हांला रामदास प्यार

पुण्य धरित्री महाराष्ट्राची धनदौलत देई
थोर ही तिचीच पुण्याई
कृष्णा, गोदा, कऱ्हा, कोयना खळखळल्या आज
मुखावरि नवतीचें तेज
इंद्रायणिच्या डोहामधली गाथा ती फुलली
सांगता आज तिची झाली
सह्याद्रीच्या कडेकपारीं उसळत आनंद
रानही नाचे स्वच्छंद
मांगल्याचा जरिपटका हा पुनरपि फडफडला
उजळला शिवनेरी किल्ला
शिवनेरीच्या शिवप्रभूला मानाचा मुजरा
समर्पूं स्वतंत्र योगेश्वरा
अनंत दीपे तेजाळत या नयनांच्या ज्योती
करुं या भक्तीनें आरती
रानफुलांची ओंजळ भरुनी अर्पूं प्रेमानें
भजूं या भक्तीभावानें

# धन्य तूं ग इंद्रायणी

धन्य तू ग इंद्रायणी धन्य तुझें पाणी
पिउनिया अमृत झाली.
सुधातुल्य केली त्यानें महाराष्ट्र वाणी ॥ ध्रु ॥
संत थोर तुझिया तीरीं तपोमग्न झाले
भक्तितुषारांनीं त्यांच्या आसमंत न्हालें
तुझ्या तटीं तरुही गाती मुग्ध भक्ति गाणीं १
सदा प्रवाहांतुनी तूझ्या घुमे नादब्रह्म
भाग्यवती इंद्रायणी धन्य तुझें कर्म
मुक्यासही देउनि वाचा, वदविलीस वाणी २
देहु आळंदीच्या नित्य नाम घोष तीरीं
" ज्ञानदेव तुका म्हणे पांडुरंग हरी "
आतुरले वेद चारी ऐकण्यास कानीं ३
काय तुवा तुकोबाची बुडविलीस गाथा
अज्ञजन देती वृथा दोष तुझ्या माथां
माय केवीं बालकाला होय जीवघेणी ४

घेतलीस प्रेमें गाथा आपुल्या कुशींत
राखलीस मायबोली आज ती जिवंत
अभंग ती तुझ्यामुळें आज भावखाणी ५
ज्ञानदेव तुकोबाचा ज्ञानदीप तेवे
महाराष्ट्र पूजी त्याला एक मनोभावें
जडो त्याच पूजेची या जिवाला शिराणी ६
तुझ्या तीरीं आळंदीचा ज्ञानवृक्ष डोले
भागवतधर्मांचें कीं बीज फुलों आलें !
विसावती ज्ञानी तेथें सुखी समाधानी ७
इंद्रायणी ! जळीं तुझ्या मीहि एक मीन
तया ज्ञान वैराग्याचा वांछितों सुदीन
कृपाबळें लाभो तुझ्या भाग्य सुधापानीं ८

# साहित्याची गंगा आली कृष्णेच्या भेटी

प्रीति संगमीं आज निनादे हृदयांचीं गाणीं
आनंदानें उसळुन येई कृष्णेचें पाणी
वसंत आला कोकिळ गाई रम्य तटावरती
भू-कुसुमें हीं फुलुन दाविती प्रेमाची महती १
साहित्याची गंगा आली कृष्णेच्या भेटी
प्रीति संगमीं पडल्या गांठी कृष्णेच्या कांठीं
पर्वकाल हा पवित्र मानुन वाग्देवी भक्त
जमले कृष्णातटीं पूजनी अतीव आसक्त २
महाराष्ट्र शारदा गाई जीं मंगलमय गाणीं
सुस्वर त्याचें पिऊन मधुरलें कृष्णेचें पाणी
कृष्णेच्या अणुरेणुंतुन जीं रुजलीं सत्तत्वें
महाराष्ट्र शारदा वागवी तीं रसमय सत्त्वें ३
गोदा, भीमा, मुठा, कोयना, प्रवरा, इंद्राणी
पराक्रमाची हिचीच गाती मुक्त कंठ गाणीं
कृष्णेच्या पाण्यांत नांदते संतांचे बोल
कृष्णेच्या पाण्यांत नांदते वीरांची चाल ४
मराठिचा इतिहास सांगतो कृष्णेचें पाणी
मराठिचा इतिहास गर्जतो कृष्णेचें पाणी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १३०११

कृष्णेच्या मातींत दरवळे गंध सुगंधाचा
कृष्णेच्या मातींत उगवतो वृक्ष सुवर्णाचा ५
कृष्णेच्या पाण्यांत डुंबले कितीक नरवीर
तेच गाजले महाराष्ट्रिचे मरहट्टे वीर
महाराष्ट्राच्या कविकुलगुरुची रसाळ रसवंती
सदैव गाती अजुन पहाती कृष्णेच्या प्रांतीं ६
शक्ति युक्ति अन् भक्ती शिकवी ही कृष्णामाई
शिवरायाच्या स्वातंत्र्याला हिचीच पुण्याई
महाराष्ट्राच्या मनोरथाची मनिषा करि तृप्त
कृष्णा कांठीं जन्मुनी झाले इथेच यशवंत ७
शिवरायाची कृष्णाघोडी फुरफुरली जेथें
माहुलीस जा साक्ष मिळेलच अजुनीहि तेथें
अजिंक्य तारा स्मृती सांगतो अचल उभारोनी
स्वातंत्र्याच्या शिवशाहीच्या ऐका कानांनीं ८
अखंड वाही कृष्णामाई श्रद्धेची आई
महाराष्ट्राच्या मांगल्याला हिचीच पुण्याई
साहित्याची गंगा आली कितीक वर्षांनीं
श्रीकृष्णेच्या भेटीला ये निज जन्मस्थानीं ९

साहित्याच्या गंगेस्तव हा सह्यागिरी सारा
स्वागत करण्या उभा ठाकला प्रसन्न सातारा
जमले कविवर ये वागीश्वर आले शाहीर
प्रगल्भ पंडिता विद्वन्मणिये देशभक्त थोर १०

समर्थ गुरुची सज्जनगडीं बघ निनादली घाट
स्वागतार्थ हा सिद्ध राहिला माहुलिचा घाट
त्याग भक्तिचा भगवा ध्वज हा पुनरपि फडफडला
निष्कामाचा कर्मयोग हा सांगे जगताला ११

स्फूर्ति देवते मंगलमाते वाग्देवी तूं तें
व्यास वाल्मिकी थकले सारे तवगुण गानाते
बोले बोबडे साधे माझे घे मानुन गोड
सद्भावाच्या भक्तिला मग कुठुनी ये तोड १२

शब्द तुझे हे भाव तुझे हे माझे नच कांहीं
अहंपणा हा उगिच कशाला नकोच मज कांहीं
अमृताचि पैजा जिंके ज्ञानेशा वाणी
तेच मराठी बोल कुतुके अर्पी तवचरणीं १३

# आजन्म भिकारी तुझ्यापुढें

आजन्म भिकारी तुझ्यापुढें
राहिलों उभा मी बघ इकडे ॥ ध्रु० ॥
वणवण हिंडुन थकलें जीवन
उबग येइ मज भीकहि मागुन
परी पाठिशीं हीच भुलावण
म्हणुन प्रभो ये तुझ्याकडे । आजन्म०
आकाशाची विशाल झोळी
त्यांत ओतता विश्व ओंजळी
भरेनाच ती कधींही काळीं
तृप्तिस्तव जगभर हिंडे । आजन्म०
तृप्तिस्तव मी फिरतों वणवण
परि नच मिळे ते तृप्तिचे कण
अतृप्तिचि हें सगळे जीवन
दुःखानें बघ हृदय कढे । आजन्म०
जग धुंडियलें तृप्तिस्तव मी
म्हणुन तुजकडे आलों स्वामी
भेट न होवो तुझी निकामी
आशेंतच मम जीव कुढे । आजन्म भिकारी तुझ्यापुढें

## कसा तुज म्हणूं मी परमेश्वर

भक्त तुझे हे किती सोसती दुःखें धरणीवर
कसा तुज म्हणूं मी परमेश्वर ॥ ध्रु ॥
मुक्या मनांतून स्त्रवते भक्ति
अनंत येते तुला प्रचिती
तरीही त्यांचे हाल पाहसी करुणाघन तूं तर
दीन दरिद्रि वंचित कोणी
भाग्यहीन खल पीडित कोणी
तूंच तयांचा भाग्यविधाता ! असती लोकोत्तर
दुष्कृत्यें तीं जिथें नांदती
तिथें कृपाघन तुझे वर्षती
पदोपदीं हे प्रत्यय येतो व्याकुळलें अंतर
पूर्व संचिते अशीं भोगती
म्हणतां शब्दच सारे अडती
तुझीच देवा धूर्त भुलावण काय वदूं उत्तर
कसा तुज म्हणू मी परमेश्वर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्र. ........ दि: ........
........ नों. दि: ........

## अविचार ( अभंग )

ऊठ गा, मना तूं
        करी अविचार
पुरे हा लाचार–
        विचारांचा

विचारें साधिलें
        कुणीं काय ? सांग
मना तूं अपंग
        होशी मात्र

विचार-आचार
        नीति, नेम सारे
दीन मानवारे
        तुझ्या माथीं !

## नकोस येऊं माझ्याजवळी

मानवतेच्या वेलीवरती
फुलली माझी नाजुक कांती
तुझें नसावें हृदय कातळी
नकोस येउं माझ्याजवळी

मुसमुसलेल्या तारुण्यानें
धुंद होउनी उन्मादानें
झिंगत गुंगत भलत्या वेळीं
नकोस येउं माझ्याजवळी

हितगुज मनिंचें सांगायाला
अधिर मनानें हुंगायाला
भ्रमरासम तूं सांजसकाळीं
नकोस येउं माझ्याजवळीं

साधी भोळी शीलवती नी
थोरकुळीची असे शालिनी
प्रीत बोलती जगीं आंधळी
नकोस येउं माझ्याजवळी

यौवनअंगणिं पडता पाऊल
तुला लागली माझी चाहूल
एकलि मज तूं पाहसि भोळी
नकोस येउं माझ्याजवळी

आतुर असशी स्पर्शायाला
करपुनि जाईल माझी काया
सर्वस्वाची होइल होळी
मुळी न येउं माझ्याजवळी

# जा उडून पांखरा दिगंतरा

कां फिरुन येशि रे, परत घरा
जा उडून पांखरा दिगंतरा ॥ ध्रु० ॥
हवास कोणा सांग पांखरा
धनी तुझा बघ करि तिटकारा
इतर कुणाचे काय विचारा
इथें अतां नच थांब जरा । जा उडून
पोपटपंची बोल तुझे ते
गोड, गोड जन ऐकत होते
आतां कोणी नव्हते तव ते
कोण पुसे तुज सांग जरा । जा उडून
पोरें बाळें वचनें टोचिती
मालकीण ही बोल बोलती
वार्धक्याची दुबळी वृत्ति
नव्हे सोबतिण जखिण जरा । जा उडून

## दिव्य-फुलास

( राग-यमन कल्याण )

दिव्य फुला उमल उमल
उधळ तुझा मधु परिमल ॥ ध्रु० ॥
स्वर्गिय तव गंध विमल
हर्षवि जनमनें विकल
विभव असो, तव अविचल
वितरित जगिं सौख्य जाल
उधळ तुझा मधु परिमल ॥ १ ॥

## त्याचें मोल

' तीळ घ्या अन् गोड बोला '
लोक सारे बोलती
ये तिळाला माधुरि
कोठोनि अंगा त्या प्रती
साखरेंने घेउनि पोटीं
तिळाला आपुल्या
आणि आलें मोल तेव्हां
दीन इवल्याशा तिळाला

## कां ठेविलें ?

भरल्या फळांचे वृक्ष आदरिती
आनंदें पोशिती सारे जन
        वठल्या वृक्षाला कोण सांभाळील
        रक्षण करील कोण तया ?
राकट जुनाट संसार-बागेंत
खोड हे नांदत उगी येथें
        झालें, गेलें त्याचें जीवन संपलें
        उगी कां ठेविले देव जाणे

## कधिं येसी ? कधिं नेशी ?

ये मृत्यो मरणाचें
सांगुन जा गुज सारें
        कधिं येशी ? कधिं नेशी
        अलगद-तूं सांग बरें
अवचित तुं येउनिया
घरट्यांतून घेउनि जा

## निर्धनाला भेटे कसा नारायण ?—

निर्धनाला भेटे कसा नारायण । त्याचें देवपण वाढे कैसें ?
धनवंता घरीं दासाहूनि दास । राही परमेश सदा काल
श्रीमंताच्या घरीं अलंकार भारी । घाली देवावरी हार तुरे
पक्वान्नांचें ताट तीनही त्रिकाळ । अन्नाचा सुकाळ देवासाठीं
भक्ति असो नसो भूलवीती त्याला । प्रभू गोपाळाला धनवंत
दीनाचिया घरीं देवा मिळे काय । जाणोनी तों होय दूर ! दूर !

## व्रतस्थ मुंजामुलास

व्रतबंध आज तुझा
भाग्य शाली हो कुमारा
किती थोर परंपरा,
भुषविसी गंगाधरा,
जीवनाच्या वाटेवरी,
धर्मदीप मांगल्याचे
क्षणोक्षणीं वाट दावी,
स्वप्रकाशे जाग्रतीचे.
स्नानसंध्या जपतप
दयादातृत्वाचे पाठ
लोभदंभ सारे बाळा.
दावी कुकर्माची वाट,
नित्यनेम हाचि पाळ
मनीं वसो सदा काळ,
सत्य संकल्पाचें व्रत,
धर्म त्याच्या पाठी प्रत
बल, शील, संवर्धन,
आणि विद्या ज्ञान कण,
नित्य वेचावें यशोधन,
धर्माचें हें अधिष्ठान

## या चला खेडयाकडें

या चला पाहुन घ्या ती दीनता अन् हीनता
खेड्यांतली ती आर्तता
अज्ञता अंधार त्यांचा घालवीण्या या पुढें
या चला खेडयाकडे
वीरता अन् क्रूरता दाक्षिण्य ही तेथें दिसे
त्याग ही तेथें वसे
डुंबती व्यसनीं सदा ते जाहले कीं बापुडे
या चला खेड्याकडे
भक्तिचा पीयूष पेला अर्पिती तें प्रेमभावें
जावुनीया अनुभवावें
आत्मीयता ही त्या परीची ना मिळे अन्याकडे
या चला खेडयाकडे
अन्नदाता तो उपाशी ना कुणा त्याची क्षिती
दैन्य त्याच्या भोंवतीं
जीवनाची जीर्णता निस्तेजता त्यांना अडे
या चला खेडयाकडे

# कोयनेस

महाराष्ट्राची भाग्यशालिनी खरीच तूं कोयना
प्रेरणा खरीच तूं कोयना
कोटि कोटि प्रणिपात तुला गे प्रेमें करि वंदना
तुझ्या कृपेचें वैभव वर्णुं किती मुखानें तरी
कुतुहले किती मुखानें तरी
देशि प्रचीती अंथागतेनें कितीक सांगूं तरी
तुझ्या तरुतळीं हसतो वारा हसतो दिक्प्रांत
प्रमोदें हसतो दिक्प्रांत
महाराष्ट्राचीं सुखस्वप्नें तीं फलद्रूप करित
तुझ्या चरणिंच्या धुळित पिकतिल आनंदाचे मळे
या पुढें आनंदाचे मळे
सुख-शांतीनें उजळत राहिल भाग्य सदा मंगलें
जिकडे तिकडे अमृत रसमय अथांग सागर भरे
तुझे हे अंथाग सागर भरे
भाग्य जलाशय शिव सागर कीं उद्योगाचे झरे
फुलली माती तुझ्या भोंवतीं नक्षत्राचे थवे
लुकलुके नक्षत्रांचे थवे
आसमंत हा न्हाला सारा तुझ्या अकाशे नवे
तुझी थोरवी तुझीच महती मुक्त कंठ गाती
कोयने मुक्त कंठ गाती
सांजसकाळीं सदाच गातिल प्रसन्न भूपाळी

## गोविंदाग्रजास

शब्दांच्या द्रोणांतुन प्रेमामृत पाजविले
भावाच्या कुंभांतुन संजीव सांठविलें
सुकलेल्या शब्दांना तेज नवें ओतियलें
मुकलेल्या शब्दांना संजीवन पाजविलें
रोप नवें शब्दाचें लावुनी तूं जोजविलें
शब्दांतुन गंध मधुर पसरुनिया दिव्य उले
भ्रमरासम गुंजारव करित सदा जन सारे
वेडावुन मानवता भावनेंत गात फिरे
क्षण आसू क्षण हासू वाग्देवी मंदिरांत
कोलाहल हर्षानल मूर्तिमंत फेसाळत
प्रेमाच्या शाहीरा शब्दाच्या निशिगंधा
मंदानल मोहविलें मकरंदा गोविंदा
हृद्वीणा घेउन तूं नादमधुर छेडियले
गानांतुन शब्दांतुन हृदयभाव नादविले
अळवाच्या पर्णावर क्षणभंगुर तव बिंदू
चमकुनिया मावळला जीवन तव शुक्रेंदु
हळहळली वाग्देवी तळमळली ही वसुधा
कुंभ रिता काव्याचा ना दिसते तींत सुधा

# माझी मातृभूमी

१

हे मातृभूमी तुझ्या पाद पद्मीं सदा घालितो गुंजना भृंग मी
धर्मी विधर्मी कुणीही असो प्रेम तूझ्या पदीं ही असे गे हमी
जगन्मंगले मातृभूमी रसाळे जगामाजि श्रेष्ठत्व आहे तुझें
ही उक्ति वाटे मना माझिया साच ब्रह्मस्व केव्हां फिटेना तुझे

२

हेलावतो भाव जो अंतरीं सागरीं त्या बुडी मारितो मी जरी
तों शक्तिचीं दिव्य रत्नें मदीया करीं येति चूर्णावयाते अरी
देई प्रभू शक्ति जी दिव्य अंगीं तुझ्या मान पूजेप्रती ना जरी
जन्मोनिया काय आम्हीं करावें अहो रात्र आम्ही नमावें अरी

३

ते जन्मले वीर गाजी शिवाजी जयांना नसे राष्ट्रदेवी तुला
न बाजी कधीं सांडिला थोरसा वीर बाजी तुझ्या कारणे जन्मला
होती फिके शत्रुचे वीर पाहोनी ज्या वीर झुंजार वीराप्रती
प्रातः प्रभातीं दिसां अन् निशाकालिं संध्या नमः पूज्यें हे संप्रती

४

महाराष्ट्रभूमे तुझ्या आर्यधामीं गमे वीर ताना असा एकला
बाजी नसे मुंडकें ही तरी तीनशें शत्रूना कापतां जाहला
छातीवरी तोफ देहांत गोळी तरी स्वामि सेवेमधीं रंगला
बाजी प्रभू तो इमानी धनी सेवनीं रंगणीं भंगला

५

वीरप्रसू ही जिजाई तशी सून ती येश्वदा यशवंती सदा
नौरंगची लेक ही रोषनारा महाराष्ट्रिची तोडितें आपदा
लक्ष्मी रमे विश्वमाता गमे लक्ष्मि ही मूर्त कालीच युद्धांतली
या राष्ट्रिच्या पंचकन्या स्मराया मुदें शोभते राष्ट्र मुक्तावली

६

तो गाजि बाजीच निर्माण झाला उमाजी उठे राष्ट्र संरक्षणा।
कित्तूरची चन्नमा राष्ट्रशक्ति स्वदेशार्थ याजीत प्राणार्पणा
गेलें गमे राज्य मेलें गमे राष्ट्र दास्यांत डुंबे पुणें पर्गणा
राज्यीं तिथें घेतला जो पुनर्जन्म शत्रूचिया टोचतो ईक्षणा

७

लक्ष्मी जणू राष्ट्रिची झाशिवाली यशोदेवि स्वातंत्र्य सौदामिनी
ह्यूरोज ही युद्ध-लीला हिची पाहतां कौतुकें मान डोलवुनी
इब्राहिमे इभ्र सांभाळुनीया इमानीपणा राखला हा इथें
मस्तत्तनी मोह मस्तानि बुंदेलवाली पुणें पाहण्या धावते

८

दास्यांत देशास ठेवूनि शत्रू जरी नाचती ते इथें थैथया
शास्त्रीबुवा येति जन्मास तेव्हां स्वदेशाभिमाना प्रती गावया
विष्णु खरा विष्णु हे वाटती कीं चिरंजीव हे मर्त्य लोकांमधीं
ते न्यायमूर्ति खरे न्यायमूर्ति पुढें आणिला तो मराठा सुधी

९

ज्याला म्हणे राज्य सत्ता लुटारू असा वासुकाका इथें जन्मला
राष्ट्रावरी प्रेम जो जो करी बंदिवासामधीं तो हिरा भंगला
फासावरी देशभक्तासि देहास ते गांजिले बंधु चाफेकर
सावर्करा लागि बंदींत ठेवून देती जयां मृत्यु प्रत्यंतर

१०

स्वातंत्र्य स्वातंत्र्य सर्वस्व स्वातंत्र्य ज्याचें असें ध्येय चेतोहर
ते हे पुण्यामाजि जन्मूनिया धन्य होती खरे बाळ गंगाधर
ज्यांच्या वचें हालते ही धरित्री असे गांधिजी कर्मयोगी खरे
वर्णी विवर्णी असे एक त्या आत्मतेजापुढें तोफगोळा झुरे

११

हा हा जतींद्रा जितेंद्रिय होवोनी देहासि तूं घातलें आहुतीं
भेटावया लागिं वीराग्रणींनाच नम्रत्व पावेल सुद्धां यती
कीं हिंदवी राष्ट्र दास्यामधें राहते मुक्त दावावया शत्रुला
कारागृहामाजि अन्नाविणें राहुनी जिंकिलें वीरत्व मृत्युला

१२

ज्यांनीं म्हणावें जयाला लुटारू तयांनीं तयांच्या गुणावर्णना
जे खेळवीती स्वयें लेखणी ती महाराष्ट्र कां धन्यता मानिना
तो धन्य ही देश ती माय भू धन्य शत्रू जरी गौरवीती कुठें
या मायभूमाजिं जन्मूनि मी धन्य पुण्याइचे पारणेंहि फिटे

१३

कृष्णा, कऱ्हा, कोयना, नर्मदा, चंद्रभागा अशा पावनी निम्नगा
गोदावरी, पंचगंगा तुला अर्पुनी अमृता स्तोत्र तुझेंच गा
संरक्षणाते कराया सदुर्गा उभा एथ सह्याद्रि जागा खडा
सायं प्रभाती सदा मंगले वाजवी चौघडा घाट माथा बडा

१४

पाठीवरी ढाल हातामधें खड्ग डोई शिरस्त्राण युद्धामधें
फेटा शिरोभागीं पायीं वहाणा तुमानी तशा गच्च पायामधें
भर्दार छाती जणू वज्र बाहूच लोखंड कांबी असे देहिंचा
डोळे जणू गुंज कल्ले मिशांचे सुशोभे मराठा महाराष्ट्रिचा

१५

या भास्कराची प्रभातीं फुटे रक्तिमा गोडसी नील तारा पथीं
ऋग्वेदिची ही ऋचा सामयुक्ता उषा गा प्रभातीं तुझीच स्तुती
संध्या स्वये ये सपर्या कराया जगद्देवते देवदूतासवें
भावें उभे देव पुष्पार्पणासाठिं पुष्पार्पणीं नित्य ना वर्णवे

१६

विद्याहि तूं माझि शक्तीहि तूं धर्म माझा असे दिव्य भक्ती भजी
तूं प्राण संचारती आज अंगीं जया लाज वाटे म्हणाया जी जी
माझे स्फुरे रोमरोमामधीं रक्त रुद्राभिषेकार्थ तें अर्पिलें
गुंफोनियां रक्त बिंदूंचिया रत्नमाला करोनी तुला पूजिलें

१७

त्वत्ध्यास लागो मना सर्वदा तूझिया चिंतनी काळ हा अर्पिला
त्वच्चिंतनावीण जो काल तो पाप कर्माप्रती वाटतो खर्चला
हे श्वास उच्छ्वास जे वाहती उष्ण देहामधें आजला तत्पर
दृष्टी सदा रूप लक्ष्मी तुझी पाहते नेत्र माझे भुके सत्वर

१८

पाऊल जें टाकणें तें सदा सर्वदा तूझिया साच सवें प्रती
ऋग्वेदिचें जें ऋचागान त्व कीर्तनीं नर्तनीं होतसे संप्रती
मी श्रांत जाई दमूभागुनी अंथरुणावरी मोहनिद्रावश
हे अष्ट दिक्पाल रक्षावया तूज जागे खडे आज रात्रंदिन

१९

दाही दिशा भारुनी वाहती वायु देतो मुदें विश्व संचालना
त्वत् किर्ति गाऊनिया मोक्षदायी स्वयें शुभ्रकीर्ती म्हणे आपणा
जगामाजि हें तेज नांदे तुझ्यावीण वाटे मला आज तेंही फिके
आदित्य हा चंद्रमा हा दवाग्नी तुला पाहुनी दीपती हे निके

२०

टेकी सहस्त्रार्जुनस्वीय हस्ता तुला वानिता श्री महन्मंगले
तो शेष वर्णावया शक्त ना वर्णनीं भाग्य जें तूजला लाभलें
मी मंद, मी मूढ प्राणी यमाधीन वानावया शक्त तूं ते कसा
हे मंगले विश्वमाते, तुला काव्यरूपार्घ्य हा बाल अर्पि असा

२१

मंदारमाला असें वृत्त हें, काव्य मंदार माला तुला अर्पिली
ओजस्वती काव्य शक्ती नसे ही परी भक्तिनें अक्षरें कोरिलीं
येना जरी श्री गणेशा तरी लेकरू लेखनीं गुंगते त्या परी
हा भारती भक्त नामा धनी शारदा रंगवी हेंच कांहीं तरी

## उदासवाणें गाणाऱ्यास

तुलाच वाटे छान । असें हें कशास करिसी गान
स्वातंत्र्याची स्फूर्ति न ज्यांत
फोल पसारा निःशब्दांत
कशास गाशी असलें गीत
कवी रे तुलाच वाटे छान निरर्थक । कशास०
चैतन्यानें जग हें नटलें
स्वातंत्र्याचे सरसुनी भाले
हिंदभूमिचे वीर निघाले
सोडुन तूं अवसान । असें हें । कशास०
स्वातंत्र्याच्या रणांगणांत
वीर जनांचें उसळें रक्त
गळयास लागे त्यांच्या तात
लटकत पंचप्राण, अरेरे !!! कसले गाशी गान
नव्या युगाला योग्य असें जें
नव युवकाला आवडतें जें
कठीण काळालाही साजें
स्फूर्तीचें दे दान, असे हे, कशास०
गा गाणीं तूं असलीं आतां
श्रवणीं पडतां स्फुरे वीरता
फासांवरती लटकत असतां
" माझा हिंदुस्थान ", निघावा, गाण्यांतुन अभिमान

# अरुणोदय

अजुन वाट पाहुं किती अरुणोदय होईना
होई पण भास मना कांहिं मज कळेना ॥ ध्रु० ॥
अंधकार चोहिकडे
घूत्कारित हीं घुबडें
दाविति भय रातकिडे
कर्कश रव त्यांचा तो मजसि ऐकवेना ॥ १ ॥
गुरु शुक्रादिक सगळे
सप्तऋषी मावळले
बघुन दृश्य हृदय उले
काय करूं घोर तिमिर हाय ! पाहवेना ॥ २ ॥
देशास्तव राष्ट्रमुनी
ध्यावयास अर्घ्य नमुनी
मीहि उभा खिन्न मनीं
पारतंत्र्य घोर रात्र अजुन कां सरेना ॥ ३ ॥

# धर्म

धर्म बुडविला महात्म्यांनीं
अधर्ममय ही केली अवनी
धर्मघ्नचि हे ऐसे म्हणुनी
कलकलाट कां उगाच करिता ? अर्थ नसे त्यांत
धर्मांचीं हीं सारीं सोंगें
तयात दडलीं अनेक बिंगें
विचार करितां शांति दुभंगे
असें असूनी धर्माचें जन माजविती बंड
किती जगाची केली हानी
धर्मांच्या या अवधूतांनीं
दुर्दैवचि कीं न कळे अजुनी
आव आणिती धर्मांचा पण " स्वधर्म मार्तंड " ! !
राष्ट्रधर्म ना जिथें जिवंत
त्या धर्मांच्या साम्राज्यांत
धर्म-वल्गना करित अहांत
धर्मांच्या त्या खऱ्या स्वरूपा गेला विसरुन !

धर्मध्वज रक्षणार्थ कोणी
प्राण अर्पिले शर्थ करोनी
भिता कायदे येता वरुनी
वृथा मारितां फुशारकी कां धर्मधर्म म्हणुनीं
कसें कळेना सत्ताधारी
खुशाल फिरती देव-मंदिरीं
आडवेन त्या कुणीच दारीं
त्या वेळेला स्वधर्म कोठें जातो समजेना !
अनाथ दुबळ्या अस्पृश्यांना
छळता विसरुन माणुसकीला
धर्म रहातो इथें कशाला
कधींच गेला धर्म, भारतीं येता परचक्र
श्रुतिस्मृतीचा द्रुम हा वठला
कशास पाणी घालित बसला
सपतारूपी लावा तरुला
फोंफावूं दे उंच उंच तो कळूं दे दिक्कालाला

# ग्रहण

ग्रहण लागे सूर्यास स्वर्गलोकीं
दान धर्मा करितात मृत्युलोकीं
करिति जन हें जपजाप्य तर्पणादी
काय घडतें पुण्य कीं पाप आधीं ॥ १ ॥
कुठें रवि तो अन् कुठें राहु केतू
कुठें आम्ही हे क्षुद्र इथें जंतु
असे नित्याचें ग्रहण चंद्रसूर्या
वेळ नाहीं कीं लागण्या सुटाया ॥ २ ॥
पारतंत्र्याचें ग्रहण आर्यभूला
किती शतकें लागलें छळायाला
किती द्यावे रक्तार्घ्य अजुनि त्याला
लागलेले ग्रह दुष्ट सुटायाला ॥ ३ ॥
ग्रहण लागे अस्पृश्य बांधवांना
राहु केतू अम्हि छळितसो तयांना
बाल-विधवांना दीन अनाथांना
ग्रहण लागे धन हीन मजूरांना ॥ ४ ॥
अजुनि ग्रहणें किति दिसति भारतांत
दृष्टि पुढती तीं उभीं मूर्तिमंत
ग्रहण कलहाचें लागलें अघोर
सुटुन केव्हा स्वातंत्र्य लाभणार ॥ ५ ॥

ग्रहण सोडुन हें जवळचें भयाण
गगनिं बघतो कीं दृष्टि लांबवून ! ! !

## स्वैर–संचार

विचार शक्तीच्या पंखावर
आरुढ होउन वारंवार
कपोल कल्पितशा सृष्टीवर
करिन मी स्वैर संचार ॥ १ ॥
स्वतंत्रतेच्या वाऱ्या माजीं
जेथें डुलते श्री वनराजी
कोणी न तेथें सत्तागाजी
करिन मी तिथें संचार ॥ २ ॥
अधिकाराचा जिथें न तोरा
भेद न ऐसा काळा गोरा
नोकरशाहिस न मिळे थारा
करिन मी तिथें संचार ॥ ३ ॥
राज्यस्थानांतिल आरवली
धर्मरक्षणीं एका काळीं
वीर रजपुतीं झुंज मांडली
करिन मी तिथें संचार ॥ ४ ॥
बाळ आइच्या अंकीं बसतें
तसें बसावें मजला वाटे
स्वराज्य जेथें जन्म सिद्धतें
करिन मी तिथें संचार ॥ ५ ॥

शिवरायाच्या सिंहगडावर
तान्हाजीच्या रणशय्येवर
जाउन तेथें नित्य निरंतर
करिन मी स्वैर संचार ॥ ६ ॥
पूर्वीचें तें वैभव गेलें
विशाल कालोदरीं बुडालें
रत्ना मागुनि रत्न हरपलें
करुं कुठें अतां संचार ॥ ७ ॥
पन्हाळ किंवा पावनगड ते
देखुनि माझें मन भडभडतें
निद्रित पूर्व स्मृति खडबडते
करुं कुठें अतां संचार ॥ ८ ॥
शनिवारांतिल वाडा आला
मनः चक्षुच्या पुढें ठाकला
क्षणांत विध्वंसित तो झाला
करुं कुठें अतां संचार ॥ ९ ॥
हृत्पटलाच्या पडद्यावरती
चलत् चित्रवत् जुनी पर्वती
दिसली वैभव शिखरावरतीं
करिन मी तिथें संचार ॥ १० ॥
पडदा सरला चित्रहि गेलें
वैभव आलें तसेंचि गेलें
हाय ! स्वप्नवत् जणूं भासलें
करुं कुठें अतां संचार ॥ ११ ॥

नानांचा तो वाडा दिसला
पेशवाइचें केंद्र भासला
राजकारणा स्थान जाहला
करिन मी तिथें संचार ॥ १२ ॥

मलू बदलला, वाडा गेला
अर्ध नारिनटेश्वर सजला
जुन्या नव्याची भेसळ बनला
करुं कुठें अतां संचार ॥ १३ ॥

बुधवारांतिल वाडा गेला
फरासखाना तेथें आला
दुष्कर्मांचें स्थानचि झाला
करुं कुठें अतां संचार ॥ १४ ॥

वाघदरी वा चाफळ खोरें
नित्य रहाया स्थान मज बरें
स्वतंत्रतेचें जेथें वारें
करिन मी तिथें संचार ॥ १५ ॥

राजगुरू ते समर्थ गेले
म्हणून कां हे दुर्दिन आले
हिंददेविचें नशिबचि फिरलें
करुं कुठें अतां संचार ॥ १६ ॥

परवशता ही सुरी भासते
रात्रंदिन मम उरीं बोंचते
हृदयविदारण करू पाहते
करुं कुठें अतां संचार ॥ १७ ॥

# दग्ध आशा

होते हेतु मनांत फार दिवसापासून संगें तुझ्या
थाटावा सुभगे नवोदित असा संसार लोकांत या
केले आजवरी मनोरथ किती सारेच ते भंगले
आशा दग्ध मनींच काय मरणें दैवी असेना कळे

आल्या आजवरीं अनेक हृदयीं सत्कल्पनेच्या सरी
गेल्या त्या वितळून पार ! सुभगे, त्या घोर कालोदरीं
स्वत्पाणिग्रहणार्थ  हा कर पुढें केला खऱ्या प्रीतिनें
ओढी गे पण काळ निर्दयपणें, ! छे तें नको बोलणें

ज्या आशेवर जीव आजवर मी कंठीत होतों जगीं
ती आशा हृदयींच हाय जळली ना सौख्य गे या युगीं
त्वन्नामस्मरण मना रमविणें या भग्न चित्ताचिया
नेवो नेइल काळ तो कधिं तरी गे दग्ध आशेंत या

## मित्रास–

भेटायास्तव यावया म्हणुनिया आलें तुझें पत्र तें
येऊं सांग कसा ? अकिंचन पुरा, मत्चित्त हें पोळतें
त्यागोनी अभिमान सर्व करितों सेवा दुजांची सदा
काव्यीं चित्त कसें रमेल मग हें भोगीतसे आपदा

देऊं दोष कुणा ! जगीं रखडणें हें पोट कीं जाळणें
हांजी हांजि म्हणोनिया जनपदीं माथा मुदें वाहणें
आणोनी मुखिं हास्य अश्रु पुसणें भारावलेल्या मना
होई शांत म्हणोनि बोध करणें साहू किती यातना

मोठी आवड काव्यलेखन खरी, ना द्रव्य हातीं मुळीं
लोकां दावूं कशा करोनि कविता माझी मती भागली
आशेची जळते चिता धडधडे ज्वाला पहा चाटती
दीनातें जगीं वालि कोण न दिसे दुःखाश्रु हे दाटती

# चुकलेला वायदा

झालें म्लान मुखाब्ज कां थबकलें अश्रू गडे लोचनीं
लज्जेचा पडदा दुरावुन उभी कां तूं अशी भामिनी !
स्कंधींचा सरला तरी पदर तो ना भान कां सुंदरी
कां तूं निश्चल सारखी उभि अशी निःशब्द जादूपरी

कां प्रीती रति रंगणांत रुसवा धमूकावणी ही अशी
चाले मन्मथजन्य काय असली लीला तुझी गौप्यशी
शब्दातीत करीतसे विनवणी इन्कार सर्रास दे
प्रीतीचा रुसवा सरेल कधिं हा सांगा तरी वायदा

ऐसा तो अपराध काय घडला मातें मनोमोहिनी !
येई निष्ठुरता कुठोनि इतकी तूं सांग हृद्‌गामिनी !
प्रायःश्चित्त मिळे पुरेपुर, गडे सोडोनि ही मुग्धता
ये ये ये हृदयेश्वरी ! हृदयिंची मालकीण तूं गे अतां

घेवोनी मणिबंधनांत मजला चुंबोनि बोले सदा
" जातांना कधिं यायचा ठरविला होता गडे वायदा "

## प्रभो ये तातडी

प्रभो ये तातडी ! ही नाव लाव रे पैलतडीं ॥ ध्रु० ॥
संसाराचा अफाट सागर
आपत्तीच्या लाटा भयकर
विचार वारा वाहे दुस्तर
यांतुन जाईल कशि होडी ! ही नाव०
मोहरूप हें वादळ सुटलें
आशा सागर भव्य उसळलें
चंचलतेचे मेघ डंवरले
त्यांत सांपडे ही होडी । ही नाव०
अनंत छिद्रें या होडीस
नाना व्याधी नांवें त्यास
अज्ञ सुकाणू मी, समयास
तशांत पाणीही दुथडी । ही नाव०
मध्य सागरीं नाव अडे ही
ऐल थडी ना पैल थडी ही
इथेंच बुडुनी जाइल पाही
बुडव तार वा याच घडी । ही नाव०

[stamp] ... ग्रंथ संग्रहालय, ठाण. ...
... ७९५९३. वि: काव्य
... १०.३७ ...
९३०१९
ना. क.

# अभागिनीचे अश्रू

कोणी एक असे गरीब विधवा घेवोनि बाळा कडे
होती केशयुता न कुंकुमपरी दृष्टी जनाच्या पडे
गेली दैववशा सखीसह अहा ती देवता दर्शना
दीर्घायू करि बालका म्हणुनियां प्रेमें करी वंदना

हर्षे बाळ बहू बघे चहुंकडे आनंदला मानसीं
नाना पाहुनिया पदार्थ करितो नानापरी चौकशी
तों कांहीं जमुनी स्त्रिया सुखभरें लावोनियां कुंकुमा
होत्या तेथ सभर्तृका प्रभुपदां वंदोनि घेती क्षमा

दुर्दैवें अबला अनाथ अपुली त्या अंतरे आदरा
झालें तोंड कलाविहीन नयनीं ये अश्रुचाहि झरा
बोले बालक त्या मधें निरखुनी मातेकडे घाबरें
आई कुंकुम लावती न तुजला केवी स्त्रिया या बरें

ऐकोनी वच हें स्वभालपटला स्पर्शोनि तेव्हां करें
बोले केवळ ईश्वरी अवकृपा ही होय बाळा बरें

## बैंदूर

( चाल :- गोकुळिचा कान्हा )

काय सांगुं सखये आतां बोलुं तरि काय ग
हूडपणा यांचा बाई जायचा कधीं ग ॥ ध्रु० ॥
लेकरासी नसती कुडतीं
बोटभरी अंगावरती
परी हवं यांच्या बैला झूल भर जरी ग ॥ १ ॥
घरीं नसे मुठभर दाणा
घालुं काय मी बाळांना
परि घालति वासरांना रोज हरभरे ग ॥ २ ॥
गळा नाहिं माझ्या मणी
हसति मला आयाबहिणी
पण बैलां गळ्यामंदीं चांदिची चाळ ग ॥ ३ ॥
पाहिलंस आमुच्या घरचा
सण काल बैंदूराचा
मिरवणूक बैलाची ती ! बादशाहि थाट ग ॥ ४ ॥
मैतर समदं जमवूनी
काल केलें निशापाणी
निशेतया नाचे धनी होऊनी बेभान ग ॥ ५ ॥

होतं नव्हतं समदं गेलं
घर असं उघडं पडलं
व्यसनं काय थोडीं थोडकीं सांगु तीं कीती ग ॥ ६ ॥
डोकीवर मंदिल मोठा
हातामंदि घेउन सोटा
फिरे जसा गांवामंदीं पाटिल कीं काय ग ॥ ७ ॥
नको काम करायाला
शेतामंदी राबायाला
चैन कशी चालायाची धनिक ना कुठें ग ॥ ८ ॥
दोन गोष्टि सांगुन तूं तर
बघ तकडं माझ्या खातर
नाहीं तर दिसतं आहे पूढचं नशीब ग ॥ ९ ॥
काय सांगु सखये आतां बोलुं तरि काय ग

# चिंतेनें रे भरलें जीवन

चिंतेनें रे भरलें जीवन ॥ ध्रु० ॥
किति जन्माची ही रे चिंता
जाइल कैशी न कळे चित्ता
अविरत जाळी जिवंत प्रेता
रात्रंदिन हें घोकित मन्मन । चिंतेनें रे०
कर्मयोग वा भोग म्हणा तर
म्हणाच कांहीं तुम्ही तया तर
मानवतेच्या मनीं निरंतर
राहतसे ती पहा चिरंतन । चिंतेनें रे०
धनिक असो कीं अधन असो ही
अदीन किंवा दीन असो ही
भेद भाव ना तयास कांहीं
सदा चित्त हे करि आक्रंदन । चिंतेनें रे०
सर्वस्वाचा त्यागहि केला
मुक्तिच्या मोहांत अडकला
चिंतेनेंच ही त्यास सोडला
अपूर्ण किति ही मानवता पण । चिंतेनें रे०
अघोर चिंता मानवजाळी
असलें जीवन मनुज कपाळीं
हव्यासहि तो सुटे नच मुळीं
जिवित मार्गी फिरतो वणवण
चिंतेनें रे भरलें जीवन

# पूजा

कुठोनी तें आणूं
पुजेचें साहित्य
बंडखोर वात्य – मन माझें
स्वागत करी मी
शब्दांच्या संभारचा
प्रेमें तूं उदारा – मानून घे
जाई जुइ चाफा
मोगरा शेवंती
असें याची भ्रांती – इथें बघ
माझ्या परड्यांत
कण्हेरी फोपावे
प्रेमें मनोभावें – अर्पीतसे
सुंगध विंगध
नाहीं मज ठावे
श्रद्धेनें अर्पावें हेंच ठावें
सुंगध असला
हृदयाशीं धरी
तुडव ना तरी पायदळीं
विषाद ना मोद
माहित मजशीं
पूजा ती अल्पशी, झाली माझी

# याल कांहो देवा

याल कांहो देवा मनोमंदिरांत
जीर्ण राउळांत देवरायरा
जन्म गेला वाया तुझ्या नामावीण
मी तो हा अजाण नारायणा
विषय भुंग्यांनीं देह पोखरीला
खुळखुळा झाला देव्हारा हा
तुझ्या पुजेसाठीं आणूं काय सांगा
सांगा पांडुरंगा तुम्हीच तें
आहे तें पुजूं मी आवडे कां तुला
सांग तूं गोपाळा प्रेमभावें
सांठविले अश्रू डोळ्यांच्या कड्यांत
तुझ्या ते स्नानार्थ सिद्ध केला
पर उपकारी झिजली ना काया
देह गेला वाया वाह्यार्थ तें
अशा या देहाचा उगाळोनी गंध
ठेविला गोविंद पुजेसाठीं
कर्माच्या दोऱ्यांत भोगाची मंजिरी
ओवोनी श्रीहरी माळ केली
देहाची पणती वासनेची वात
अहंभाव त्यांत तेल घाली
क्रोधाच्या अग्नींत धूप वासनेचा
लोभ इंद्रियाचा जाळण्याला
सुकृताचीं फळें नैवद्याच्यासाठीं
ठेवी जगजेठी तुझ्यापुढें

## विधिची कारागिरी

थांब जरा लाडकी । पाहुं दे विधिची कारागिरी
सौंदर्याची मूस सांडिली
विधी ओतितां हातामधली
स्वर्गांतुन ये रस कां खालीं
तयाची मुर्ति गोजरी । पाहुं दे विधिची कारागिरी
कां चपलेला दृष्ट लागुनी
मेघांचे तट फोडुनि अवनी
पडली कां ही विश्व मोहिनी
विश्व दिपवणारी । पाहुं दे विधिची कारागिरी
गगनांतिल ढग काळे पिंजुन
केस विरचिले कां हे त्यांतुन
संतत धारा जणुं ही श्रावण
शोभे शीर्षावरी । पाहुं दे विधिची कारागिरी
आकाशांतिल दौलत फोडून
विधी आणि कां त्यांतिल चोरुन
दोन चांदण्या-त्यांचें कोंदण
बसवी नयनावरी । पाहुं दे विधिची कारागिरी

गुलाब गालां आंत लपविलें
कांट्यांचे नच भान राहिलें
कांटे रुतुनी रक्त सांचलें
चिमण्या गालांवरी । पाहुं दे विधिची कारागिरी
अभिनव नाजुक मांगल्याची
मोहक मूर्ती कोमलतेची
ल्यालि भूषणें वसुंधरेची
वसुधा चेतो हरी । पाहुं दे विधिची कारागिरी
निष्पापाची नयन मनोहर
छवी हांसरी हो दृग्गोचर
पावित्र्याची प्रतिमा सुंदर
शोभे गौरी परी । धन्य ही विधिची कारागिरी

# सारेच भिकारी !

मज भिकारणीला पाहुन कांहो हसता
सारेच भिकारी जगीं विचारें बघतां
( धनवंत दिसाया दिसोत कोणी कोणी )
पण खरें पाहतां भिकार आम्हाहूनी
कुणि असो, भूपती भिकार ठरतो तोही
सम्राट शिकंदर अखेर रडला पाही
तो भिकारीच कीं स्वामी त्रैलोक्याचा
हव्यास तयाला आहे आत्मस्तुतिचा
कुणि हमाल यत्नें कवडी कवडी मिळवी
साम्राज्य मिळुन ही कुणास आशा झुरवी
जनिं दुर्धर आशा कुणास आहे सुटली ?
घे मुमुक्षुही पण करिं मोक्षाची झोळी
दुनियाच भिकारी सारी या परि असता
मग भिकारिणीला कां हो पाहुन हंसतां
ही भरेल झोळी मुठभर धान्यें माझी
साम्राज्य मिळालें तरी तुम्ही ना राजी
मग मलाच कांहो हंसतां धिक्कारानें
क्षण पहा आपुली उघडुन अंतःकरणें

## मोहिता

अशि कशि ग पडलि मोहिनी ॥ धृ० ॥
सखे त्या बघता बघता क्षणीं
ते कोण आणि कोठलं
मज मुळींच ना उमगलं
पण हृदयीं माझ्या प्रबळ प्रीत तोंच साजणी
मी सहज उभी अंगणीं
ये अवचित ते ग कुणी
परि बोलुं कशी मी, सांग तू तरी लाज दाटली मनीं
तें मोहक मुख पाहुनी
हरपलं भान साजणी
खळबळ मनिं या काय उडालि, सांगुं कसं वर्णुनी
मी खरं सांगु कां तुला
तूं नको रागवुं मला
निघून जावं त्यांच्या संगं आलं माझ्या मनीं

मी वेडि नव्हे तर कां ग
कां पुसूं नये तेव्हां सांग
नांव गांव त्या कोण, कोठचें, कुठें जायचे धनी
किति सोसुं गडे ताप हा
होइल भेट का पहा
भविष्यवाणी बोलुन मजला शांत करी तूं क्षणीं
ते व्हावेत जिवाचे धनी
एवढीच आस मन्मनीं
परि दैव कुठें ग माझं इतकं, मी तर वनवासिनी
कां म्हणतिस होतिल धनी
पुरविल कां आस भवानी
पुरवूं दे ग अंबा माझी भरिन ओटि तिज पांच फळांनीं
खणा-नारळांनीं

# निरोप

जाणार सासरीं तूं सोडून आज आम्हां
जा बाळ तूं सुहास्ये सौभाग्यपूर्ण धामा
देतां निरोप तुजला परि अंतरांत आमुचा
आनंद अन् विषादें ये कंठ दाटुनिया
आहेस तूं गुणांची तैशी विचारवंत
विद्याकलादिकांनीं आहेस शोभिवंत
हृदयें कशीं धरावीं ठावें असे तुला तें
दे प्रेम, घेई प्रेम अन् वाढवी सुखातें
उधळीत मंगलाला जो आपुल्या घराला
मांगल्य जें तुझें तें तव वाढवो सुखाला
हास्यांतुनी फुलूं दे संसार सत् कळ्यांनीं
गुणगंध उधळुनी दे पसरो तुझ्या स्तुतींनीं
कर्तव्यपालनांत राही सदैव दक्ष
त्या आर्य कन्यकांची मनिं नित्य ठेव साक्ष
रंगून जाइ तेथें संसारनंदनांत
माहेरच्या जनांची स्मृति राहुं दे मनांत

## उदयाचलिं येत अरुण

उघडि नयन शेषशयन शेषाचलवासा
उदयाचलिं येत अरुण ऊठ वेंकटेशा ॥ ध्रु० ॥
गहन निशा सरुन उषा मुदित करि दाहि दिशा
आसमंत तेजाळत अंशुमालि ये श्रीशा ॥ १ ॥
करकमली दंवबिंदू भरुन येइ दिव्य उषा
मुखमार्जन ऊठ करी ऊठ वेंकटेशा ॥ २ ॥
श्री देवी भूदेवी वाट बघत येथ अशा
करविरपुरवासिनि श्री उठवी त्वां जगदीशा ॥ ३ ॥
उडुगण हे आळविती दास तुझे स्तवन करनी
श्रीनिवास ऊठ अता प्राची करि आरती ॥ ४ ॥
चरण कमल दावि अणि चरणांकित या दासा
करुणाकर कवि माधव गरुडवाहनेशा ॥ ५ ॥
उघडि नयन शेषशयन शेषाचलवासा
उदयाचलिं येत अरुण ऊठ वेंकटेशा

## दिपवित ही आली

उधळित जल मंगलमय कोयना हि आली ॥ ध्रु० ॥
मुदित करी भोंवतालीं सहज चरण चाली
गिरिं कुहरीं जल पसरे
भू कुसुमें गंध भरे
मुक्त दान करित करित दैन्य-दुःख जाळी
लाख भुके पोट भरे
उद्यम श्रम शांत झरे
वाहत करि आकांक्षा तृप्त भोंवतालीं
ही उदंड विद्युल्लता
देत फिरे मानवता
दिपवित ही चमकत ही तेजाळत आली

# प्रीतिच्या या आसवांनीं

प्रीतिच्या या आसवांनीं
बांधिली मुंडावळी
बाळ जा हे बोलतांना
लोचनें पाणावलीं
बोहलें शृंगारिलें हें
स्वस्तिकानें तें जरी
अंतरींची ही व्यथा कां
थांबते त्याच्यापरीं
पूस बाळे, आसवें तीं
मोह सारा सोडुनी
सावधानें साधुनी जा
प्रेम मंगलवर्धनी
पाडसा हैराण होसी
सांग ना आतां किती
प्रीतिचा सुस्कार संपे
संपलें त्या या प्रती
जा अतां हें सांगतांना
कापतें काळीज बाळे
नांद जा आतां सुखानें
वत्सले तूं पूस डोळे

## जय - पाहिमां करुणाकरा

त्राहि मां करुणांबुधे भवमोचका कमलावरा
चारु-सच्चरिताऽमृतागर पाहि मां करुणाकरा
सन्मुनीश्वर वंदिता जय भक्तजन लीलालया
दुष्ट दैत्य-विनाशकर जय निर्झरा भक्ताभया ॥ १ ॥
देवकीसुख-कंदभूसुर-वंद्य गोकुळक्रीडना
नंद मंदिर भूषणां जय पूतनां-मद-दर्पणा
वत्स धेनुक-मर्दना हतकेशिया नलप्राशना
वज्रपाण्युपसर्दकर गोवर्धनोद्धर-पावना ॥ २ ॥
गोपिमानस-रंजना वृषभानुजासह क्रीडना
गोरस- प्रिय गोपियाचित पूरिता मनकामना
भानुजातर शालशंस-कदंब-पल्लव-वीजना
गोपगोकुलवृंद वेष्टित कालियाफणिमर्दना ॥ ३ ॥
भाव सोज्वळ वर्णिता-विधि-गर्व- खंडित शामला
प्रेमलांकित वेणु कूजित मोहिता जगताखिला
कुंज मंजुळ संजितासह गोपसुंदरि कोमला
सेविता वृजयोषितार्पित भक्ति-गोरस निर्मला ॥ ४ ॥
चाणुरा-सुरमारका-मुनितारका-कंसांतका
देवकी-वसुदेव बंधन मोचका सुर-तोषका
सांदिपाग्रणि अग्रजासह आर्तजन सेवका
सर्वसाक्षि न कर्मरहिता वेदसूत्रानुशासका ॥ ५ ॥

रुक्मिणी-लिखितांकिता जय भाव सोज्वळ वर्णिता
रुक्मियासह-चैद्य दुर्मद चूर्णिमा पर्णिता
शोधितासु शमता हरि पणिता सात्राजिता
अक्रुरोद्धव सात्यकी सुर नारदादि समर्पिता ॥ ६ ॥
धार्तराष्ट्र विनाश कारण पांडव प्रिय माधवा
द्रौपदी व्यसनार्त-भूषित वेष्टिता नव पाटवा
साग्रषष्टि सहस्र भूसुर अत्रिनंदन तर्पिता
स्थापिता ध्वज मारुतात्मज धार्तराष्ट्र सुबोधिता ॥ ७ ॥
भूत भावन देव देवा सत्त्व रक्षित पांडवा
शंख चक्र गदाधर, प्रिय पांडवा हुत खांडवा
सव्यसाचि रथाग्रराजित वर्षिता गीतामृता
धूत कल्मष मानसा हरि कंठ जा असिता सिता ॥ ८ ॥
दुष्ट कौरव भार मारक शांत नव संतारका
कालयौवन शासका पुरवासिता नवद्वारका
दिंडिराट विवासिता जय भक्त भूषित प्रेमळा
पुंडरीक प्रेरितासन प्रस्थरांकित विठ्ठला ॥ ९ ॥
भावपूरित कूजित-स्तव शृण्वतां कमलावरा
मद्हृदांबुज संपुटाश्रित ज्ञान सोज्वळ निर्झरा
मध्वराज वरोरुहार्पित शामला वार्ता गिरा
शृण्वतां विबुध प्रिया जय पाहिमां करुणाकरा ॥ १० ॥

## पांडुरंगाचा पाळणा

नीज सख्या आतां, भगवंता, पंढरिच्या नाथा
कटिवरती हात, ठेवोनी, तिष्ठत चक्रपाणी
अठ्ठावीस युगें, तूं राहसी, निज न तुज ये कैशी
आले संतजन, रिझवाया, धवल तुझें यश गाया
तुकया संताची, ही वाणी, अभंग गाई गाणीं
तन्मय होवोनी, भक्तजनीं, आळवि करुणा गानीं
श्री ज्ञानेशाची, ही ओवी, ऐकत करि अंगाई
भाविक मुक्तीण, तुज देवा, निजवी भक्ति भावा
टाळ-मृदंगांचा, तुज छंद, ऐकत निज गोविंद
पालक हलवाया, येइ जना, निज निज गोपीरमणा
तूं झोपी जाया, श्रीरंगा, गाते चंद्रभागा
दारीं वाट बघे, रुखमाई, तिष्ठत तव या पायीं
जा जा घननीळा, नीज क्षणीं, निज तूं चक्रपाणी
देई हिंदोळा, गोपाळा, माधव गावुनि तुजला

## मोहिनी

लागून नादिं या तुझ्या अये अवतसे
फसलोंच परी तें आतां सांगुं मी कुणाला कसें ?
अशी कशी घातली तूं हि मला मोहिनी
कल्पना न करवे माते मतिमंद होय मी मनीं
जडलाच छंद हा तुझा ध्यास सारखा
रात्रंदिन दिससी डोळां क्षण एक न जाई फुका
किति सुखांत होतों अम्हि घरकुलांत या
सहचरी बाळ सांगाती संसार होय स्वर्ग हा
तव संगत जडतां क्षणीं सौख्य लोपलें
संसार दुःखमय झाला कां कसें तेंहि ना कळे
ही अगाध तव गे कृती धन्य चातुरी
भाळुनी जीव तव नादें हो पिसाट वेड्यापरी
तूं खरी प्रतापी बये जादुगारिणी
मज समान किति लोकांना झुलविशी कोणत्या गुणी
टाळेन संगती तुझी म्हणे मी किती

तो उलट दुणावे बाई ! ही तुझी दुष्ट संगती
गणगोत मित्र त्यागिले पायिं मी तुझ्या
मी तुझ्याच करितां बाई आपदा किती सोसिल्या
जाईन कुठें मी तिथें पाठिं लागसी
या जनीं विजनीं बाजारीं ही किती धिंड काढिसी
एकान्तीं बसलों जरी प्रिय सखे सवें
हटकून तिथेंही येशी साधण्या वैर तिजसवें
गुणगूण ऐकतां तुझी म्हणे ती मला
घालवा सवत बाहेरी खपणारच नाहीं मला
किति मत्सर दोघीमधें काय मी करूं
सोडुं मी कुणाला सांगा, सांगाच कुणा मी धरूं
स्वप्नांत येउनी कधीं मध्यरात्रिला
उठविशी सांगशी कांहीं जें नवेंच सारें मला
कुणि म्हणोत तुज शारदा स्फूर्तिदाइनी
विपरीत प्रचीती माझी तूं गमशी मज मोहिनी

# नको मागाहून भांडण ते

मायेच्या बाजारीं,        हवें तें मिळेना
नको तें तें मना        दृष्टी पुढें        १
येतां जातां वाणी,        काय हवें तुम्हां
पुसतसे आम्हां,        सारखे ते        २
काय सांगूं देवा        हेवे जें तें यांना
स्वार्थ लोलुपांना        सांगूं कैसें        ३
आतां माझें मज,        केव्हां गवसेल
हीच तळमळ,        जाळी मना        ४
होतें पुण्यधन,        दिलें यांच्या हातीं
आहे हें मागती,        देऊं कैसें        ५
विसंबूनी देतों,        राहिलें हें धन
देवा नारायण !        तुम्हापासीं        ६
पापाचिया पापा        देवा मायबापा !
नका देऊं थापा        तुम्ही मज        ७
घ्या हें पुण्यधन        पहा निरखून
नको मागाहून,        भांडण तें        ८

## जाऊं कोणापाशीं सांग आतां

मृत्यो त्वा वन्दाना, नको दावुं करुणा
तुझा क्रूरपणा, पाहूं तरी
ग्रासुं पाहतोसी, गुणवंता लागीं
तुझी रीत जगीं प्रसिद्ध ही
हा मी पहा उभा, सिद्ध तुझ्या पुढें
दाखवि केवढें, बल तुझें
डोळ्यांनी मी अंध, हात पाय पंगू
आणि काय सांगूं, सांग; तुला
असा मी असतां अनंत दुर्बल
भीसी कां जवळ यावयास
जग धिक्कारीलें तूंहि धिक्कारीसी
जाऊं कोणापाशीं, सांग आतां

# चाललि घरट्यांतुनी

गोजिरवाणीं चार पांखरें चालिल घरट्यांतुनी
आंसवें गाळित नयनांतुनी
आईबाप ना सगे सोयरे कोणि न जगतीं तया
तयांची कुणा न येई दया
दुर्दैवाचा सूर्य नभांतुन फेकित अग्नीवरी
टिकेना पदही भूमीवरी
नयनास दिसेना कुठें जरा आसरा
आटला दयेचा मानवतेचा झरा
उसळला भुकेचा डोंबहि उदरीं पुरा
ओघळलेले डोळ्यांतुनी घे पिऊन अश्रु झणी
पांखरें चालिल घरट्यांतुनी
निजमातेला निजताताला बोलवि आक्रंदुनी
भरुन ये अश्रुजलें लोचनीं
मृदुल फुलासम काया कोमल करपत चाले क्षणीं
तृषेनें व्याकुळली ती मनीं
भरले जग हें बघतें डोकावुनी
कोरड्या दयेचा कुंज तयाच्या मनीं
तडफडुनी पाखरें पडलीं धुलीकणीं
अनाथ नाथा तुझ्याविणा पण कोण तया अवनीं
निर्माता तूंच तयाचा धनी

# बाळ तूं ध्रुवा रे

हसवित ये, सुखवित ये, बाळ तूं ध्रुवा रे
आतुर तव स्वागतार्थ आम्ही ही तुझ्या रे
तू येतां घरकुलांत
हर्षभरें बिलगतात
कुरवाळुनि चुंबित तुज मोदमयी तुला रे
बाळ गुणी भाग्यवान
रूप तुझें छान छान
आनंदें हृदयभरें पाहता तुला रे
करपल्या जिवास बोल
शांति देति किती अमोल
ऐकवुनी सुखवि सदा गोजिऱ्या ध्रुवा रे

## प्राक्तनाचा प्रातःकाल

सांगायाला धजेना
        मन माझें संकोचतें
प्राक्तनाचा प्रातःकाल
        उगवेलसें वाटते
सामावल्या सर्व आशा
        प्रारब्धाच्या सुप्रभातीं
आणि आले किं हो ढग
        पिंजारुनि सूर्याभोंतीं
उगी आशा भासवी ते
        दैव वेडे मन्मनाला
कर्म दे हुलकावण्या ह्या
        खंत ना या जीवनाला

## स्वर्गही ठेंगणें इथें

विजू, राजा, तशी शाला
प्रभू मालति हीं मुलें
पंचप्राण प्रपंचीं या
जीवनीं फुललीं फुलें
मंगला विमला राज्ञी
गृहणी ग्रहमुच्चते
सदानंद भरें गेहीं
स्वर्गही ठेंगणें इथें

## माझें गांव

माळ आहे पसरलेलें गांवच्या शेजारला
गीत गाई साथ तेथें देव ओढा वैभवाला
त्याच ओढ्या कडेला लिंब आंबे पसरलेले
दिव्य छाया त्या तरूची पोसती प्रेमें फुलें
टेकडीच्या मध्यभागीं मंदिरें तीं दोन तेथें
साक्ष देती हे अजूनी दिव्यतेच्या पुर्तते
भावभक्तिचा उमाळा तेथ येई मुर्तिमंत
जाणुनी हे ये भुकेले तृप्त होई शांत भक्त
इश्वराचा सांब लिंग मूक भावें बैसला
भक्तिभानें भक्त वाही बेल त्या मल्लारिला

# सांत्वन

करुं नको सख्या चिंतन
जातील दिवस द्वाड हेही पण
जाउं दे गेलि चाकरी
शोधुया आणि कोठें तरी
मिळेल तोवर जाइन धनि मी रोज मज मजूरीनं-करु नको सख्या०
चिंतन वृथा कशास करणं
ठेवील प्रभू तो तसं राहणं
सुखदुःखें हीं पूर्वजन्मिच्या मिळती सुकृतासम-करुं नको सख्या०
हीं संकटं नाहींत कुणा
चुकलीं न देव-देवांना
राम प्रभू पण गेले ना तें तुडवित सारें वन-करुं नको सख्या०
त्या पांच पांडवांवरी
किती घोर संकटं तरी
करि दुर्योधन पांचलीचें सभेंत विडंबन-करुं नको सख्या०
सुख नाहिं मुळीं धनिकांत
सुख नसे राजवाड्यांत
पहा नांदतें झोपडिमाजीं सुख तें रात्रंदिन-करुं नको सख्या०
संसार सिंधु हा पहा
किति दुथडी भरला अहा
यांतुन जाणें पैल तिराला सोपं दिसतं पण-करुं नको
लेंकरं हीं घरीं गोजिरीं
हींच राया दौलत खरी
या विण धनें तें काय जाळणं हीच सुखा साधन
करुं नको सख्या चिंतन जातिल दिवस द्वाड हेही पण

# अभागी जीवन

अभागी जीवाचें जीवन
शोक हा नावरे रात्रंदिन
माय पिता मज सोडुन गेले
आप्तेष्टांनीं दूर लोटिले
स्नेह सोबती सर्वहि त्यजिले
या जगांत प्रेमाविण-अभागी जीवाचें जीवन
संसाराची सखी सोबती
दोन अर्भकें सोडुन जगतीं
तींही गेलीं स्वर्गावरतीं
खेळ हा काळाचा निर्घृण-अभागी जीवाचें जीवन
संसाराचें छत्र ढासळें
धाय मोकली दोन्हीं बाळें
ऐकोनी तें हृदय उन्मळें
मायेच्या माउलीविण-अभागी जीवाचें जीवन
सुख सोईला सर्व सोबती
दुःखी आतां कुणी न येती
पाहुन मजला तोंड चुकविती
फोल तें सारें आश्वासन-अभागी जीवाचें जीवन
माध्यान्हीची वेळ टळाया
दुसऱ्या दारीं निलाजरें या
लाजिरवाणा जीव जगाया
करावें लागे आक्रंदन – अभागी जीवाचें जीवन
कसेंबसें तें अन्न कोंबणें
खातां खातां अश्रु सिंचणें
अशापरीनें जीव जगविणें
वद कोणतें कारण--अभागी जीवाचें जीवन

# वसुंधरेची ओवाळणी

आज दिवाळी म्हणून कां ही वसुंधरा नटली
कुणी चालली ओवाळाया घाई कां झाली
आतां माझ्या ध्यानीं आलें, विश्वंभर भाऊ
त्या भावाला ओवाळाया, घालाया न्हाऊं,
वनराणी ही हरिततृणाचें रम्य वस्त्र ल्याली
जणुं हिरव्या दरि गोड खळ्या कां शोभतात गालीं
गडबड पाहुन वसुधेत्री ती मारुत दे शीळ
भान कुठें पण आहे तिजला एकचि तें खूळ
दंवबिंदूंनीं वसुधा घाली न्हाऊं विश्वेशा
पुसावयाला वस्त्र ढगांचें निळसर दे ईशा
शुभ्र ढगाचा दाट, रांगुळीं इंद्रधनुष्याची
ओवाळाया वसुधा बसवी मूर्ति परेशाची
प्रभातिंचा तो कुंकुम लावी ती प्रभुरायाला
प्रभातिचे रविकिरण गुंफुनी माळ घालि प्रभुला
आकाशाच्या तबकामध्यें निरांजनें दोन
त्यांत उजळले तेजोमय ते चंद्रसूर्य जाण
नक्षत्रांच्या करुनि अक्षता टाकी प्रभुवरती
काय घातली प्रभुरायानें ओवाळणि ताटीं

+ + +

सांगा, सांगा, रसिकांनो हें उलगडाच कोडें
धन्य धन्य चातुर्य तयाचें सोडवि जो कोडें

## हळूच बघते

बाला एक दिनीं वनीं विहरतां
पुष्पें स्वहस्तांतुनीं
आणि व्यक्त करावयास अपुला
प्रेमा पतीकारणीं
वेंचोनी सुम एक सुंदर स्वयें
देई स्वनाथा करीं
बोलें जोडुनि हात घ्या सुमन हें
नाथा सुगंधी करीं
हातीं पुष्प धरोनि नाथ वदला
'हे लाडके, सुंदरी
देई गे ! करिं पुत्ररत्न दयिते
या रम्य पुष्पापरी'
बाला ऐकुनी लाजली हळु वदे,
'ही काय थट्टा गडे,
जातें मी' वदुनी हळुच बघते
चोरुन नाथाकडे

# राधा - माधव

राधा :– अधरीं पावा धरुनि केशवा काढी स्वर नाना
चित्त-- कोकिळा हे यदुपाळा हरपूं दे भाना
सकल कुंजवन फिरुनि मुरारी सुमनें वेचियलीं
हार गुंफिला तुजसाठीं हा वृत्ति गुंग झाली
कां नच वदसी एक शब्दही रोष काय धरिला
बोल जिविच्या जिवलग सखया योग्य न हें तुजला
तुजसाठीं मी वेडी झालें, सोडुनि संसारा
राधा-माधव वदति एक जन कां न कळे चतुरा
तुझ्या कृपेविण होईल कैशी सांगे गति माझी
नको कन्हया अंत पाहुं रे कांहीं इतराजी
काय असा मी प्रमाद केला सांगें यदुनाथा
शब्दासाठीं जाण झुकले ठेवी पदिं माथा
हास्य कुठें तव दडलें कृष्णा, तृष्णा मम पुरवी
निशिदिनिं वाटे तुजला घ्यावें आज दुजी कुठली
लटकें सगळें प्रेम दाविलें आजवरीं मजला
शठा उमगला डाव तुझा मज फसविसि अबलेला
वद अद्यापी किती मोहिल्या त्या मुग्धा बाला
जादुगार तूं केवळ गमसी स्वजना त्या मुकल्या
पुरे पुरे करि ढंग अतां हे बोल गड्या मजसी
व्यर्थ लबाडा गळा कापण्या कां माझा सजसी

छंद लागला नंद किशोरा वंदन तव पाया
गंध नसे मज भक्तीचा परि प्रेम देइ सखया
पदारविंदीं भृंगी गुंगे संगे धन्य करी
रंगे वृत्ति माया ममता मुरली कंसारी
केव्हांची तुज आळवितें मी सरली काय दया
दोष दिला परि खेद वाटतो क्षमा करी सखया

माधव :– पुरे अता करि बोल राधिके जाई सदनाला
अपराधाविण दोष लाविसी केवि सांग मला
केव्हांपासुन वाट पहातों परवा नच तुजला
हार नको हा देइ फेकुनी गंधहीन असला
स्त्री जातीचा अंत न लागे कपटाची राशी
कळले राधे प्रेम तुझे मज हो परती कैशी
पहा पलिकडे धेनु चरती जातों मी तिकडे
हरी न दिसता हरिणाक्षी ती पाहे चोहिकडे

राधा :–बोले नच हो कठोर ऐसा चुकलें घे पदरीं
नको वाजवूं नाहीं आग्रह पावा ठेव दुरी
मुरलीपायीं मूर्ति सुखाची अंतरली मजला
शोधुं किती तुज हे घननीळा, मुकुंद, गोपाळा,
सांग कोकिळे मंजुळ-कंठे मधुसूधन–वार्ता
बोला तरुनो, वदा लतांनो, झालें मी आर्ता

पाषाणा तूं काय पाहिला राधा हृदयेश
पाझर फुटला तुज न परी तो दिसतो जगदीश
उभ्या राहुनि काय करीती येथें या गाई
घाबरून कां दृष्टि लाविती शून्य दिशा दाही
प्राण विसांवा दिसे न त्यांतें जीव बहु दमला
हरहर आतां जाऊं पाहे प्राणहि या काला
पूर अश्रुचा वाहे नेत्रीं उत्कंठित झाले
नयन–मनोहर कधीं हरीची पाहिन पदकमलें
ऐक कन्हया मम शेवटची ही करुणा वाणी
नच येशी तरि मृत देहातें देखशील नयनीं
भोळा माझा भाव परंतू वृत्ति तुझी भलती
भार भूमिला झाले जगुनि काय लाभ जगतीं
येते आतां पुढच्या जन्मीं अंतर नच देई
कृपा करावी क्षमा असावी विनती ही पायीं

वृक्षांतरित प्रभु त्या वेळीं पाहि कसोटी ही
मंजुळ वेणु ध्वनी काढुनी चित्र तिचें मोही
जिवा शिवाच्या पडल्या गांठी प्रेमा ये भरती
मध्वराज कवि वंदित राधा–दामोदर मूर्ती

## श्री ज्ञानेश्वर माउलीचें महाप्रस्थान

[ संगीतिका ]

**निवेदक : –**

कार्य संपुनी आज निघाली ज्ञानेश्वर माउली ॥
अखेरचा त्यां निरोप देवूं अर्पुन सुमनांजली ॥
भक्तीची ही स्फूर्तिदेवता मंगल वागेश्वरी ॥
अहा चालली आम्हां सोडुनी सोडुन अलकापुरी ॥ १ ॥

धन्य धन्य आळंदी ही पुण्यवंत झाली
भक्तिगंध दरवळताहे आज भोंवतालीं ॥ ध्रु ॥०
स्वर्गातुनि देव अहा
आले हे येथ पहा
पंढरिचा राणा ही येत अंशुमाली ॥ १ ॥
थोर आज पर्वकाल
साधाया देव सकल
तैसे हे ऋषिगण कीं स्वर्गच ये खालीं ॥ २ ॥
विश्वच हें घर ज्याचें
भक्त उणे कां त्याचे
साधु संत व्याकुळुनी जमत भोंवतालीं ॥ ३ ॥
भक्तिगंध दरवळता हे आज भोंवताली

ज्ञानेश्वर :–

बंधुनो नमवित मी माथा ।।
प्रेमभरानें निरोप घ्या मज सरली मम गाथा ।। धु ।।०
अंतीं पाहुन घेतों मागें
सर्व तुटून घ्या जीवन धागे
सुरु जाहला इथून पुढती स्वर्गाचा पायथा

ब्रह्मवृंद :–

अधमाहुनिही अधम जाहलों ब्राह्मण हो आम्ही
डाग लाविला ब्रह्मत्वाला क्षमा करा तुम्ही
कसले पंडित कसले शास्त्री संसारी दास
कर्मठ आम्ही धरिली गर्वें स्वार्थाची कास
निष्कलंक निरपराधा तुम्हां छळिलें बाळांना
पश्चातापें दग्ध जाहलों क्षमा करा आम्हां
दिव्यत्वाची दिव्य प्रचिती कितिदां तव आली
तरिहि त्याची महती आम्हा मुळींच ना कळली
वेदाध्ययनी कसलें आम्ही व्यर्थ वेद पढलों
महिषावदनीं वेद वदविले दिङ्मूढच झालों
महातपस्वी चांगदेव तो व्याघ्रावरि आला
अति नम्रत्वें जड भिंतीवर तुम्ही स्वार झाला
धन्य अगा तूं ज्ञानेशा रे देवचि अवतरसी
म्हणुनि धावले देवहि साक्षात् तुझ्या दर्शनाशीं
अगाधि महिमा पाहुनि ऐसा तुझा धन्य झालों
क्षमा करावी अतां दयाळा शरण तुला आलों

ज्ञानेश्वर :-

वृथा खंत लावुनि घेतां आपुल्या मनाला
पापकार्य धर्माचरणी आपुल्या कृतीला
दैवयोग म्हणुनीया हा क्लेश भोग नाना
भाल पटल भागीं लिहिलें तें कुणा चुकेना
फिरे चक्र प्रारब्धाचें थांबतें कुणाला ॥ १ ॥
नका होऊ गमनीं माझ्या शोक व्यग्र व्यर्थ
प्रेम भक्ति नामस्मरणें व्हा तुम्हा कृतार्थ
धर्मदीप असती नाथा निवृत्ती तुम्हाला ॥ २ ॥

नामदेव :-

विरक्त वृक्षावर, फुले हा योगी ज्ञानेश्वर
संतांचा सद्भक्त मुकुटमणि
गीतेचा भावार्थ सुलभ जनि
सांगे सोपस्कर —फुले हा योगी ज्ञानेश्वर ॥ १ ॥
मरणाचें भय निरसन करुनी
जागृतींत मरणा आलिंगुनि
पावन योगेश्वर – फुले हा योगी ज्ञानेश्वर ॥ २ ॥

ज्ञानदाता हा निवाला । ज्ञान झालें पोरकें ॥
फोडु मी टाहो किती हा । ज्ञान झालें पारखें ॥
अंतरींची आर्तता अन् । नयनिं आर्द्रता
दाटला अंधार सारा । हृदय उलले देखता
मित्र माझा बंधु माझा । देव माझा तूंच रे
पाखडे हा जीव माझा । चालला मत् प्राण रे

चक्रवर्तीयोगी । पहा समाधिस्त
ज्ञान सूर्य अस्त । होतो आज ॥ १ ॥
पंढरी सोडोनी । पांडुरंग आले
डोळे पाणावले । देवाचेही ॥ २ ॥
भिजे आसवांनीं । आळंदीची वाट
चालवेना नीट । कोणालाही ॥ ३ ॥
संतांचा हा राणा । प्रस्थाना निघाला
निरोप देण्याला । संत आले

**संत मंडळी :–**

तुला पाहुनी हृदय उन्मळे भक्तिभाव अंतरीं
जनसागर हा जमला सारा शोक सागरावरी
विरह व्यथेनें भरलें अंबर
भान हरपलें तुझ्याच खातर
फुलें अश्रुचीं तव चरणांवर
ओघळते ही पहा अखंडित तव भक्तिची धार

**ज्ञानेश्वर :–**

संत मंडळी पिटवा तुम्ही भक्तिचा डांगोरा
भक्तियोग हा तारिल तुम्हां भाविक लहान थोरा
अमृतसंगे पैज जिंकिती जे मम प्राकृत बोल
लोण पोंचवा घराघरां मधिं भक्ति रुजवा खोल
आत्म्याचें अमरत्व तुम्हांला मीं कां हें सांगावें
व्यर्थ शोक कां करितां आतां जनकार्या लागावें

माझें जाणें, विलीन होणें परमेशाच्या चरणीं
हृदयो हृदयीं माझी वाणी ठरवा अमर कहाणी
माझी वाणी प्रसाद माझिया निवृत्तिनाथांचा
तुम्हांस होति भक्तिपथावर तेच योग्य नेता

**निवृत्तिनाथ :–**

निवृत्ति कसा मी मज न कळे –
यावेळिं वृत्ति मम उचंबळे ॥ ध्रु ॥
एकलकोंडा उभा राहिलों
ज्ञानदेव गुरु हेहि विसरलों
कोण बरें मी आतां उरलों
मन माझें जळफळे खुळें । या वेळीं वृत्ति मम उचंबळे ॥ १ ॥
निरोप घेण्या ये ज्ञानेश्वर
आतां देऊं काय त्यास वर
चित्त कुठें हो आतां हें स्थिर
गळति आसवें हृदय उलें । निवृत्ति कसा मी मज न कळे ॥ २ ।

**ज्ञानेश्वर :–**

निवृत्तिनाथा, निरोप घ्यावा मजला सद्‌गुरु राया ॥
भावभक्तिनें वंदन करितों निरोप द्या जाया ॥
तव कृपेनें मुखांतुनी मम ज्ञानेश्वरी ही आली ॥
मराठी रुपें भगवत् गीता भगवंतें वदविली ॥ १ ॥
निवृत्त आपण प्रवृत्त केलें मज गीता ही गाया
असली जादू तुम्हां साधली तुमची ही किमया

सरलें माझें काय अग्रजा विसरुं नका बाळाला
जातों मी निज धामा घ्यावे आशिर्वच बंधूला ॥ २ ॥

**निवृत्तिनाथ :–**

आनंद आज झाला तुज पाहताच बाळा
तूं श्रेष्ठ जाहलासी गुरुहून आज चेला
भगवंत् वाग्विलासे गतमोह पार्थ झाला
त्वा कृष्ण होवुनिया जनपार्थ उद्धरीला
तूं सत्य कर्मयोगी तूं एक ज्ञानयोगी
तूं जाय मोक्षमार्गी सायुज्य मुक्ति भोगी
सोपान बाळ मुक्ता समजावि तूं तयातें
तूं शांतवून जाई कुरवाळुनी तयातें

**ज्ञानेश्वर :–**

हा सोड सोड सोपान सोड अज्ञान ॥ ध्रु ॥
सोपान तूंच मोक्षाचा
दाविसी जगा तूं साचा
ज्ञानदीप घेवुनी चल पुढें, नको करुं अनमान ॥ १ ॥

**मुक्ता :–**

तुला घ्यायची होति समाधी तर कां आम्हां वाढविलें
रडे दळढळा सोपाना तो निवृत्तिनाथहि आसवले
अद्वैताला तोडुनि जासी नको जाउं रे ज्ञानेशा
ऐक विनवणी मुक्तेची ही दीन भगिनिची पहा दशा ॥ १ ॥

आईची ती अविरत माया कुणी लाविली सांग मला
कुणी काढला रुसवा फुगवा जवळ घेतलें तसें मला
कोडकौतुका करुनी माझ्या मायापांखर घालि कुणी
तूंच विचारी तुझ्या मनाला बाळपणीच्या आठवणी
आज अचानक लोटुन जाशी लोटुन जा तर अग्निमध्यें
तुटेल धागा निरंतराचा स्मृती जळो मम तयामधें
काय समाधी इथें लागली शब्द मुखांतुनि उमटेना
ओघळती हे अश्रु नयनीं रितें हृदय परि होईना
थांब जरासा कर आधीं मज विमुक्त तुझिया मुक्तेला
मुक्तेविण तूं मुक्त कसा रे होशिल न कळे मुळीं मला

**ज्ञानेश्वर :-**

मुक्ता बाळे आतां आवरी आंसवें
लोचन पुसावे आधीं बाळा ॥ १ ॥
मुक्ताई नामानें माय ताते तुला
जीवन मुक्त केला देह तुझा ॥ २ ॥
शोभतो कां तुला शोक हा लौकिक
लोळे सदा मोक्ष तुझ्या पाया ॥ ३ ॥
सोड मिठी बाळे मुक्ताई जाऊं दे
प्रेमें निरोप दे बंधु राया ॥ ४ ॥

**निवेदक :-**

अवतार आजि सुखें संपविला
दीप हा ठेविला ज्ञानदेवी ॥ १ ॥

ज्ञानभक्ति योग संगम साधला
सुलभ दाविला मोक्षमार्ग ॥ २ ॥
अलकापुरींत याच याच ठाया
ठेवियली काया समाधींत ॥ ३ ॥
भाविकांनीं तेथें यावें भक्तिभावें
शब्द ते ऐकावे योगीयाचे ॥ ४ ॥
अस्त नोहे झाला भक्ति ही उदेली
ताटी उघडिली ज्ञानदेवें ॥ ५ ॥

दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ।
जो जें वांच्छील तो तें लाहो । प्राणिजात ॥

श्री ज्ञानेश्वरी अ. १८ ओवी १७९५

अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादु चंद्रमा
करूं मज पूर्णिमा । स्फूर्तीची जी
जी अवलोकिलिया मातें । उन्मेष सागरीं भरितें
वोसंडेल स्फूर्तीतें । रसवृत्तीचे

ज्ञानेश्वरी ३·१४·२३·२८

REFBK-0013499
REFBK-0013499

## शेवटीं मी

नाहीं ज्ञान विरक्ति बुद्धि धन ही
मी पारखा सद्‌गुणा
नाहीं काव्य कला विनोदहि तसा
आहे गुणांनीं उणा
ऐसें जीवन हें असून तरिही
सौभाग्य मातें मिळे
शांती पूर्ण सदैव ती मिळतसे
हें गूढ ना आकळे